रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १११
www.ramprahar.com

◆ शनिवार, ८ नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

उलवे कोस्टल रोडमुळे नवी कनेक्टिव्हिटी/२

घरपट्टीवाढीच्या विरोधात पोलादपूरमध्ये मोर्चा/५

खोपोलीत राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा/८

## पनवेल मनपा निवडणुकीसाठी ११ नोव्हेंबरला आरक्षण सोडत



**पनवेल :** येथील महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध प्रवर्गांसाठी आरक्षण निश्चित करण्याची प्रक्रिया आता सुरू झाली आहे. या अनुषंगाने अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) तसेच सर्वसाधारण महिला आरक्षणासाठी सोडत काढण्यात येणार आहे. या संदर्भात महानगरपालिकेने अधिकृत जाहीर सूचना प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार ११ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आरक्षण सोडत काढण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या वेळी लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना, नागरिक तसेच इच्छुकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## वंदे मातरम् गीताचे भव्य समूह गायन

# नवीन पनवेलमध्ये देशभक्तीचा जागर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

थोर तत्वज्ञ व कवी बंकिमचंद्र चटर्जी यांनी वंदे मातरम् हे गीत लिहिले, त्याला १५० वर्षे पूर्ण झाली. 'वंदे मातरम्' हे शब्द उच्चारताच प्रत्येक भारतीयाच्या रोमा-रोमात देशभक्तीचा संचार होतो. अशा या राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असलेल्या गीताचा गजर शुक्रवारी (दि. ७) देशभर घुमत असताना पनवेलमध्येही भव्य स्वरूपात त्याचे समूह गायन झाले. नवीन पनवेलमधील बांठिया विद्यालयाच्या मैदानावर झालेला हा राष्ट्रप्रेमी उत्सव मातृभूमीप्रती अभिमान आणि देशभक्तीची भावना जागवणारा अविस्मरणीय अनुभव ठरला.

महाराष्ट्र प्रदेश आणि उत्तर रायगड भाजपच्या वतीने हा वंदे मातरम् समूह गायन विशेष कार्यक्रम राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने अभिनेते व राष्ट्रविचाराचे प्रसिद्ध व्याख्याते शरद पोंक्षे यांचे प्रमुख वक्ते म्हणून वंदे मातरम् गीताची पार्श्वभूमी व महत्त्व यावर मार्गदर्शन झाले. या वेळी या कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, ज्येष्ठ नेते वसंत भोईर, श्रीनंद पटवर्धन, सुनील घरत, **(पान २ वर..)**





(अधिक छायाचित्रे पान ८ वर)

> **वंदे मातरम् हे गीत सर्वांच्या अस्मितेचे प्रतीक असून ते भारतीय संस्कृतीचे आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे. आज या गीताला १५० वर्षे पूर्ण झाली. हे गीत भारतभूमीला दिलेला ठेवा आहे. केंद्र व राज्य सरकारने हे कार्यक्रम करत असताना भाजपनेही त्याच अनुषंगाने व्यापक स्वरूपात कार्यक्रम आयोजित केले आहेत. भारतभूमीबद्दल सर्वांना अभिमान आहे. त्यामुळे वंदे मातरम् गीत जनमनापर्यंत आणि पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहचले पाहिजे यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या विशेष कार्यक्रमात विद्यार्थी, संस्था, संघटना, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले, त्याबद्दल मी सर्वांचे मनापासून आभार मानतो.**
>
> **–आमदार प्रशांत ठाकूर, कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक**

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

> **मातृभूमीबद्दलचा अभिमान अधिक वृद्धिंगत व्हावा आणि वंदे मातरम् गीताची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहचावी या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. देशभक्तीचे हे वातावरण बघून प्रभावित झालो. आमदार प्रशांत ठाकूर यांना समाजातील सुख-दुःखाची जाण आहे. त्यामुळे ते असे समाजोपयोगी उपक्रम राबवित असतात.**
>
> **–गणेश नाईक**, मंत्री, महाराष्ट्र

> **'वंदे मातरम्'चा कुठल्याही धर्माशी संबंध नाही, तर हे गीत ही आपल्या मातृभूमीला पृथ्वीमातेप्रती अर्पण केलेली आदरांजली आहे. या गीतात आपल्या देशाबद्दलची अपार श्रद्धा, प्रेम आणि अभिमान व्यक्त झाला आहे. भारतभूमीचा इतिहास अलौकिक आहे, संस्कृती अद्वितीय आहे आणि जगाच्या पाठीवर तिच्यासारखी दुसरी भूमी नाही. त्यामुळे वंदे मातरम्चा खरा अर्थ प्रत्येक भारतीयाने समजून घेतला पाहिजे. हे केवळ गीत नाही, तर आपल्या राष्ट्रभावनेचे, एकात्मतेचे आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहे.**
>
> **–शरद पोंक्षे, अभिनेते व राष्ट्रविचाराचे प्रसिद्ध व्याख्याते**

## पुणे जमीन व्यवहार रद्द

### उपमुख्यमंत्री अजित पवारांची माहिती



**मुंबई : प्रतिनिधी**

पुण्यातील कोरेगाव पार्क येथील ४० एकर जमिनीचा व्यवहार रद्द करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी (दि. ७) दिली. या प्रकरणात एका पैशाचाही व्यवहार झालेला नव्हता, असे खुलासाही त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना केला.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, या व्यवहाराची मला अजिबात माहिती नाही. माहिती असती तर मला विचारून व्यवहार झाला आहे, असे बोललो असतो. माझ्या नातेवाईकांनी किंवा जवळच्या व्यक्तीने व्यवहार केला तर मी त्यांना नियमाला धरून व्यवहार करा, असे सांगत असतो. हे प्रकरण बाहेर आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरला असताना भाष्य केले होते. त्यांच्याशी फोनवर बोलताना मी त्यांना स्पष्टपणे सांगितले की, तुम्ही राज्याचे प्रमुख आहात. तुम्हाला जे योग्य वाटते ते करा, कारण आरोप करणे सोपे असते, पण वस्तुस्थिती समोर येणेही आवश्यक असते.

या प्रकरणात मोठ मोठे आकडे दिले गेले. विरोधकांनीही आरोप केले, पण जमिनीची जी नोंदणी केली होती, ती रद्द करण्यात आली असल्याची माहिती मला मिळाली आहे. नोंदणी कार्यालयात नोंदणी केलेली कागदपत्रे रद्द करण्यात आली आहेत. ती जमीन सरकारी आहे. त्यामुळे त्याचा व्यवहारच होऊ शकत नाही. जमीन पूर्वीची महार वतनाची आहे. त्यामुळेच अतिरिक्त सचिवांच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणाची चौकशी केली जाईल, असेही उपमुख्यमंत्री पवार यांनी स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री पवार यांचे चिरंजीव पार्थ हे संचालक असलेल्या अमेडिया होल्डिंग्ज एलपीपी या कंपनीने पुण्याच्या मुंढवा परिसरातील १८०० कोटी रुपये इतके मूल्य असलेली सुमारे ४० एकर जागा तीनशे कोटी रुपयांना विकत घेतल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. त्यावर माध्यमांशी संवाद साधत विरोधकांचे आरोप खोडून काढत उपमुख्यमंत्री पवार यांनी हा व्यवहार रद्द करण्यात आल्याची माहिती दिली आणि वादावर पडदा टाकला.

## निवडक

### पुण्यापाठोपाठ नाशिकमध्ये बिबट्याचा हल्ला; तरुण ठार

**नाशिक :** पुण्याच्या शिरूरनंतर नाशिकमधील लोहशिंगवे गावात बिबट्याच्या हल्ल्यात ३५ वर्षीय सुदाम जुंदरे या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ग्रामस्थांना शुक्रवारी (दि. ७) पहाटे ५च्या सुमारास गावाजवळ छिन्नविछिन्न अवस्थेत जुंदरे यांचा मृतदेह आढळला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी करत ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत.

### कृषी समृद्धी योजनेंतर्गत अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना अनुदान

**मुंबई :** अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पुन्हा उभारी मिळावी यासाठी कृषी समृद्धी योजनेंतर्गत ड्रोन, शेततळे, सुविधा केंद्र आणि ट्रॅक्टर चलित रुंद सरी वरंबा (बीबीएफ) यंत्रांसाठी शासनाकडून अनुदान देण्यात येणार आहे. या संदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आल्याची माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

## विश्वविजेत्या भारतीय संघातील महाराष्ट्राच्या खेळाडू, प्रशिक्षकांचा गौरव

### मुख्यमंत्र्यांकडून कौतुक, रोख पारितोषिकाने सन्मान



**मुंबई : प्रतिनिधी**

आयसीसी महिला विश्वचषक स्पर्धेचे विजेतेपद पटकावून भारतीय महिला संघाने इतिहास घडवला आहे. विश्वविजेत्या भारतीय संघाचा भाग असलेल्या महाराष्ट्राच्या खेळाडू व प्रशिक्षकांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि. ७) रोख पारितोषिक देऊन सत्कार केला.

वर्ल्डकप विजेत्या भारतीय संघातील महाराष्ट्रातील खेळाडू स्मृती मानधना, राधा यादव, जेमिमा रॉड्रिग्ज, प्रशिक्षक अमोल मुझुमदार व सपोर्ट स्टाफच्या गौरवार्थ मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वर्षा शासकीय निवासस्थानी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री फडणवीसांसह उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडामंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्यासह प्रधान सचिव संजय खंडारे, आयुक्त शितल तेली आदी उपस्थित होते.

या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते टीमची उपकर्णधार स्मृती मानधना तसेच खेळाडू जेमिमा रॉड्रिग्ज आणि राधा यादव यांचा विशेष गौरव करण्यात आला. या तिन्ही खेळाडूंना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रत्येकी सव्वा दोन कोटी रुपयांचा धनादेश, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. टीमच्या या ऐतिहासिक विजयामुळे केवळ देशाचाच नव्हे, तर महाराष्ट्राचाही नावलौकिक वाढला आहे. खेळाडूंना मिळालेला हा सन्मान राज्यातील इतर महिला खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरेल, असे मुख्यमंत्री म्हणाले. **(पान २ वर..)**

## उत्तेजक इंजेक्शनची अवैध विक्री

### अलिबागच्या आक्षी येथे धाड; विक्रेता ताब्यात

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग अल्पवयीन मुलांना तसेच तरुणांना उत्तेजक इंजेक्शनची अवैध विक्री करण्याचा उद्योग एकाने तालुक्यातील आक्षी येथे सुरू केला होता. पोलिसांना या गोष्टीचा सुगावा लागताच त्यांनी धाड टाकून उत्तेजक औषधांचा साठा जप्त केला आणि अवैध औषध विक्री करणाऱ्याला ताब्यात घेतले.

वेल्डिंगचा व्यवसाय करणाऱ्या सुरज मनोज राणे याने आपल्या दुकानात बेकायदेशीरपणे उत्तेजक आणि नशाकारक औषधांचे वितरण सुरू केले होते. आसपासच्या परिसरातील अल्पवयीन मुले आणि तरुण त्याच्याकडे येऊन या औषधांची इंजेक्शन खरेदी करत होती. व्यायामशाळेत उत्तेजना वाढवण्यासाठी तसेच नशा करण्यासाठी मुलांकडून या औषधाचा सर्रास वापर सुरू असल्याची खात्रीशीर माहिती अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे यांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी बनावट गिऱ्हाईक पाठवून या माहितीची खातरजमा केली. त्यानंतर आक्षी येथील सुरज राणे यांच्या वेल्डिंग वर्कशॉपवर धाड टाकली. त्या वेळी त्याच्याकडून एकूण चार हजार ८५६ रुपयांचे मेन्टरमाईन सफ्फेटची इंजेक्शन्स जप्त करण्यात आली.

या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३च्या कलम १२५, २७८ अन्वये सुरजवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे अन्न व औषधी प्रशासनाकडून ड्रग्ज ॲण्ड कॉस्मॅटीक ॲक्टमधील तरतुदींनुसार स्वतंत्र कारवाई करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनानुसार निरीक्षक किशोर साळे यांचे पथक या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

मुलांनी वैद्यकीय सल्ल्याशिवाय कुठल्याही प्रकारच्या उत्तेजक व नशाकारक औषधांचे सेवन करणे जीवघेणे ठरू शकते. व्यायामशाळेत जाणाऱ्या तरुणांनीही या प्रकारांपासून दूर रहावे तसेच पालकांनी आपल्या मुलांकडून अशी इंजेक्शन घेतली जात नाही ना याची खातरजमा करावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## जेएनपीएच्या ई-स्पीडबोटची ट्रायल रन



**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीएची मुंबईशी जोडणाऱ्या ई-स्पीडसेवेच्या ट्रायल रनला शुक्रवार (दि. ७) पासून सुरुवात झाली. त्यामुळे येत्या दोन-चार दिवसांत जेएनपीए-मुंबई सागरी मार्गावर ही प्रवासी वाहतूक सुरू होऊन तासाचा प्रवास ३५-४० मिनिटांतच होणार आहे.

उरण-नेरूळ रेल्वेमार्गावर प्रवासी वाहतुकीला सुरुवात झाल्यानंतर जेएनपीए-मुंबई सागरी मार्गावरील प्रवासी संख्या मोठ्या प्रमाणावर घसरली आहे. त्यामुळे जेएनपीए-मुंबई या सागरी प्रवासी मार्गावरील बोटसेवेचा खर्च परवडेनासा झाल्याने आणि प्रवासी वाहतुकसाठी वापरण्यात येणाऱ्या जुनाट लाकडी बोटी खार्चिक व सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातूनही उपयुक्त नसल्याने जेएनपीएने ई-स्पीडबोटीचा पर्याय निवडला आहे.

प्रदुषणविरहित इलेक्ट्रॉनिक बॅटऱ्यांवर चालणाऱ्या अत्याधुनिक तंत्रज्ञान व सोयी सुविधांनी सुसज्ज असलेल्या दोन ई-स्पीडबोटींचे कंत्राट माझगाव डॉक बिल्डर्स लि. कंपनीला आहे. दहा वर्ष ई-स्पीडबोटींची सेवा पुरवण्यासाठी जेएनपीएने ३७ कोटी ८९ लाख ९४ हजार १९० रुपये खर्चाची तरतूदही केली आहे.

> *तांत्रिक अडचणी दूर करून माझगाव डॉक बिल्डर्स लि. कंपनीने ७ नोव्हेंबरपासून ई-स्पीडबोट सेवेच्या ट्रायल रनला सुरुवात केली आहे. ट्रायल रन दोन दिवस घेण्यात येणार आहे. त्यानंतर प्रवासी वाहतुकीला सुरुवात केली जाईल.*
>
> ***–नीरज**, माझगाव डॉक बिल्डर्स लि.चे एचआर*

> *ई-स्पीडबोटीची ट्रायल रन आजपासून सुरू करण्यात आली आहे, मात्र प्रवासी वाहतूक करण्यासाठी आवश्यक सुरक्षितता, स्पीड, बॅटरी चार्जिंग आणि ई-स्पीड बोटींच्या कामगिरीबाबत समाधान केले जात नाही, तोपर्यंत ई-स्पीडबोट प्रवासी वाहतुकीला परवानगी दिली जाणार नाही.*
>
> ***–कॅ. बाळासाहेब पवार**, जेएनपीएचे उपसरंक्षक*

## पनवेलमध्ये आज अधिवक्ता कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड अधिवक्ता परिषद आणि पनवेल वकील संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शनिवारी (दि. ८) सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत अधिवक्ता कार्यशाळा २०२५ आयोजित करण्यात आली आहे.

या वेळी प्रमुख वक्ते म्हणून राज्याचे माहिती व तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, सुप्रसिद्ध, अभ्यास वक्ते ज्येष्ठ विधीज्ञ सुशील अत्रे (जळगाव) आणि अधिवक्ता परिषद कोकण प्रांत पालक, अधिवक्ता दीपक गायकवाड (नेरळ) यांची; तर पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवाचे माजी अध्यक्ष व विद्यमान सदस्य, ज्येष्ठ विधीज्ञ अधिवक्ता पारिजात पांडे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. त्याचप्रमाणे मुंबई उच्च न्यायालयातील सिनियर कौन्सिल व अधिवक्ता परिषद कोकण प्रांत अध्यक्ष अधिवक्ता संजीव गोरवाडकर यांची विशेष उपस्थिती असणार आहे.



## रोटरी प्रीमियर लीगचे शानदार उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बहुप्रतीक्षित रोटरी प्रीमियर क्रिकेट लीगच्या पाचव्या हंगामाला सुरू झाली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन कामगार नेते महेंद्र घरत आणि आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ७) करण्यात आले. या वेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून खेळाडूंना प्रोत्साहित केले.

टीआयपीएलच्या सौजन्याने तसेच रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल आणि रोटरी क्लब ऑफ पनवेल सिटी यांच्या माध्यमातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे स्पर्धेचे पाचवे वर्ष असून हे क्रिकेट सामने नवीन पनवेल येथील दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकॅडमीमध्ये ७ ते ९ आणि १४ ते १६ नोव्हेंबर या कालावधीत रंगणार आहे.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी नगरसेवक गणेश कडू तसेच मिलिंद मोहिते, नितीन ढमाळे, सुबोध जोशी, अनिल ठकेकर, अमोद दिवेकर, प्रशिक्षक अमित जाधव, रवींद्र उगरण, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, सिकंदर पाटील, विजू निगडे, संजय बताले, रतन खरोल, अमर म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, रोटरी क्लबचे सदस्य आणि खेळाडू उपस्थित होते.

# विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत घडवूया

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन



**मुंबई : प्रतिनिधी**

जात, पंथ, धर्म, भाषांचे भेद विसरून स्वातंत्र्यलढ्यात सर्वांनी 'वंदे मातरम्' म्हटले होते. वंदे मातरम् हा स्वातंत्र्यलढ्याचा परवलीचा शब्द होता आणि क्रांतिकारकांचे घोषवाक्यही याच गीतातून तयार झाले. विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत घडवण्यासाठी राष्ट्रभक्ती आणि एकात्मता आवश्यक आहे. यासाठी 'वंदे मातरम'च्या सामूहिक गायनाने संकल्प करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सामूहिक 'वंदे मातरम' गीत गायनप्रसंगी केले.

मंत्रालयात वंदे मातरम् गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग आणि सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित सामूहिक 'वंदे मातरम' गायनाचा कार्यक्रम मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, कौशल्य विकास, रोजगार, नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश कुमार, पद्मश्री पद्मजा फेणानी-जोगळेकर यांच्यासह मंत्रालयातील वरिष्ठ सनदी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पद्मजा फेणानी-जोगळेकर यांच्यासोबत सर्व मान्यवरांनी एकत्र येऊन वंदे मातरमचे गायन करत राष्ट्रभावना दृढ करण्याचा संकल्प व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वंदे मातरम् हे केवळ गीत नाही, तर देशाला जोडणारी, एकसंध ठेवणारी भावना आहे. कोलकाताच्या टाउन हॉलमध्ये ३० हजारपेक्षा अधिक जनता जमली होती. त्याठिकाणी पहिल्यांदा वंदे मातरमची पहिली घोषणा झाली. त्याला प्रतिसाद देत ३० हजार लोकांनी सामूहिक वंदे मातरमचा जयघोष केला. त्यानंतर वंग-भंग चळवळीच्यावेळी प्रेरणा गीत, संघर्ष गीत झाले. त्या दिवसापासून सगळीकडे, इंग्रजांच्याविरुद्ध 'वंदे मातरम' म्हणत लढा सुरू झाला. प्रभात फेऱ्या, कार्यक्रमांमध्ये, आंदोलनामध्ये हल्ला केला तरी 'वंदे मातरम' गायिले जात होते. काँग्रेसच्या अधिवेशनात रविंद्रनाथ टागोरांनी वंदे मातरम् गायिले. यानंतर जात, धर्म, पंथ सगळे विभाजन विसरून संपूर्ण भारतीय समाज एकत्र येऊन वंदे मातरम् चे घोषवाक्य तयार झाले. तेव्हापासून हे एक प्रकारे राष्ट्रगीत म्हणून 'वंदे मातरम' तयार झाले.

या वेळी पूर्वा निर्मिती विश्वतर्फे 'वंदे मातरम'वर पथनाट्य सादर करण्यात आले. सर्व धर्म, भाषांमधून विविध पोषाखात हातात वंदे मातरम् लिहिलेले फलक घेतलेले युवक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. कार्यक्रमानंतर दिल्ली येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे 'वंदे मातरम'चे सामुहिक गायन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संबोधन झाले.

वंदे मातरम् गीताचे संपूर्ण देशभर गायन होत आहे. या गीताने स्फुरण येते. शब्द, गीत, प्रेरणा म्हणजेच वंदे मातरम् आहे. हे स्वातंत्र्य गीत, आत्मिक प्रेरणा गीत असून क्रांतीकारकांनाही प्रेरणा देणारे समर गीत असल्याचे प्रतिपादन मंत्री आशिष शेलार यांनी केले. सर्व धर्म, जाती, पंथ येवून गीत गातात, यातून एकत्रित जगण्याची प्रेरणा मिळते. जगाला हेवा वाटावा असे एकमेव गीत असल्याचेही त्यांनी प्रास्ताविकात सांगितले.

# प्रियकराच्या मदतीने पतीचा खून करणाऱ्या पत्नी व प्रियकरास जन्मठेप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यानुसार पनवेल येथील अतिसत्र न्यायाधीश एस.सी.शिंदे यांनी शुक्रवारी (दि.७) आरोपी पत्नी प्रितीदेवीसिंग राठोड व प्रियकर गौरवसिंग याला इं.पि.को. क. ३०२, ३४ अन्वये दोषी धरून जन्मठेपीची शिक्षा ठोठावली आहे.

गुन्ह्याची थोडक्यात हकिगत अशी की, प्रितीदेवी हिचा विवाह हरिओम यांचेशी झालेला होता. प्रितीदेवी हिचे आरोपी गौरवसिंग याचेशी प्रेमसंबंध होते. तिघेही कानपूर येथील राहणारे असून गौरवसिंह व प्रितीदेवी यांच्या प्रेमात हरिओमसिंगचा अडथळा असल्याने दोघांनी त्याचा काटा काढण्यासाठी त्यास पनवेल परिसरास नोकरी लावण्याच्या बहाण्याने रेल्वे तिकीट काढून पळस्पे परिसरात आणले होते. तेथून पळस्पे येथील मोकल चाळ, रूम नं. ६, येथे भाडयाची रूम दि. २२/०७/२०१९ रोजी घेवून दुपारी तिघेही रूममध्ये गेले. तिथे गौरवसिंग व प्रितीदेवी यांनी चाकूने भोसकून हरिओम याचा गळा चिरून व अनेक ठिकाणी वार करून खून केला. शेजाऱ्यांना भांडणाचा आवाज आल्याने शेजारच्या रूममधील साक्षीदारांनी दरवाजा ठोठावला. त्यावेळी प्रितीदेवी व गौरवसिंग रक्ताने माखल्याचे दिसले. साक्षीदारांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात फोन लावून याबाबत कळविले. पोलीस तातडीने रूम नं. ६ येथे पोहोचले असता पोलिसांना मयत हरिओमसिंग जखमी व मयत अवस्थेत आढळला. आरोपीही तेथे सापडल्याने पोलिसांनी त्यांना तत्काळ अटक करून गुन्हयाचा तपास चालू केला.

दोन्ही आरोपीने उलटसुलट बचाव घेत गुन्हा केल्याचे नाकारले. हरिओमसिंग यांनी आत्महत्या केली असेही त्यांनी सांगितले. प्रत्यक्ष साक्षीदार नाही असे सांगून आरोपीच्या वकीलांनी खून कोणी केला? कसा केला? खून की आत्महत्या? असे संशयाचे भूत कोर्टासमोर निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सरकारी वकील वाय.एस.भोपी यांनी आरोपीच्या अंगावरील जखमा, मयताच्या अंगावरील जखमा, वैद्यकीय अहवाल यांच्या आधारे खून असल्याचे कोर्टास पटवून दिले. घटनेच्या वेळी रूम नं. ६ मध्ये आरोपी व मयत यांच्याशिवाय इतर कोणही नव्हता अशा परिस्थितीत परिस्थितीजन्य पुरावा मे. न्यायालयास दाखवून दिला.

या वेळी दोन्ही आरोपींनी खून केले असल्याचे मे. न्यायालयास पटवून दिले. मे. न्यायालयाने सरकारी वकिलांचा युक्तीवाद मान्य करून आरोपीस जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. हा खटला सिध्द करण्यासाठी तपासिक अंमलदार भिंगारदिवे, तायडे, सरिता मुसळे, कोर्ट ऑर्डर्ली चव्हाण व रसिका राठोड मॅडम यांचे महत्वाचे योगदान लाभले.

# तळा येथे वंदे मातरम् गीताने जागवली देशभक्तीची भावना



**तळा : प्रतिनिधी**

वंदे मातरम् गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रांगणात ७ नोव्हेंबर रोजी वंदे मातरम् सामूहिक गीत गायनाचा भव्य व उत्साहवर्धक कार्यक्रम झाला.

या गौरवशाली सोहळ्यास समितीच्या अध्यक्षा व तळा येथील तहसीलदार स्वाती पाटील, प्रमुख अतिथी सुनील जगताप, तळा पोलीस ठाणेचे पीएसआय विजय पाटील, तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त मारुती शिर्के, सचिव मंगेश देशमुख, शाळा समितीचे चेअरमन महेंद्र कजबजे, सी. डी. देशमुख औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य एस. एन. शेरे, उद्योजक पांडुरंग महाडिक, किशोर वेदक, सुभाष मुंढे, गो. म. वेदक विद्यामंदिर तळाचे मुख्याध्यापक दिलीप ढाकणे यांच्यासह तळा शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उत्कृष्टरित्या निवेदन सुहास वावेकर यांनी केले. यावेळी प्राथमिक विद्यामंदिर, गो. म. वेदक विद्यामंदिर, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, जी. एम. वेदक सायन्स कॉलेज, जिल्हा परिषद शाळा तसेच तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शाळांमधून वंदे मातरम् राष्ट्रीय गीताचा जयघोष

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये वंदे मातरम राष्ट्रीय गीताचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

स्व. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय रचित 'वंदे मातरम् या भारताच्या राष्ट्रीय गीताच्या निर्मितीला ३१ ऑक्टोबर, २०२५ रोजी तिथीनुसार म्हणजेच कार्तिक शुद्ध नवमीला १५० वर्षे पूर्ण झाली.

राज्यातील शाळांमधून रोज वंदे मातरम् या गीताची पहिली दोनच कडवी गायिली जातात, परंतु १५० वर्षपूर्तीचे औचित्य साधून सर्व शाळांमधून संपूर्ण वंदे मातरम्चे गायन व्हावे व वंदे मातरम् गीताचा इतिहास सांगणारी प्रदर्शन शाळांच्या दर्शनी भागात लावून वंदे मातरम् गीताचा संपूर्ण इतिहास विद्यार्थ्यांना माहीत व्हावा या उद्देशाने शाळेमध्ये हा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



शाळेमध्ये वंदे मातरम राष्ट्रीय गीताचे संपूर्ण गायन घेण्यात आले तसेच वंदे मातरम गीताच्या इतिहासाविषयी माहिती देणारी प्रदर्शनी शाळेत आयोजित करण्यात आली.

वंदे मातरम राष्ट्रीय गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सव दिनाच्या समारंभासाठी सर्व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व समितीचे सदस्य, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपतर्फे आज विविध कार्यक्रम


**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान २०२५ अंतर्गत नवी मुंबईत भाजपतर्फे विविध कार्यक्रमांचे करण्यात आले असून अनुषंगाने ८ नोव्हेंबर रोजी एस. व्ही. ज्युनियर कॉलेज नेरूळ येथे सकाळी १० वाजता युवा संमेलन, दुपारी १२ वाजता शिरवणे विद्यालय, सेक्टर २, नेरुळ येथे महिला संमेलन, १२ नोव्हेंबर दुपारी २.३० वाजता पारसिक हिल बेलापूर येथे व्यापारी, लघुउद्योजक व प्रबोधनाचे संमेलन अशी कार्यक्रमाची रुपरेषा असणार आहे, अशी माहिती भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांनी दिली.

यात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त पदयात्रा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, नशामुक्त भारत, स्वदेशीची प्रतिज्ञा दिली जाणार आहे. त्याचबरोबर आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत प्रत्येकाच्या मनामनांत स्वदेशी ही संकल्पना रुजवण्यासाठी युवा मेळावा, बचत गट - व्यापाऱ्यांचं सहसंमेलन घेतलं जाईल. बिरसा मुंडा यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त मंदिरे, शाळा, स्मारके येथे दिपोत्सव साजरा करण्यात येईल.

जनजातीय स्वाभिमान संमेलनांतर्गत नवी मुंबई क्षेत्रात जास्तीत जास्त मन की बात कार्यक्रम घेतील त्यांचा सन्मान, विविध सन्मान मिळालेल्या व्यक्तींचा देखील सन्मान या अंतर्गत करण्यात येणार असल्याचे डॉ. राजेश पाटील यांनी सांगितले.

# उलवे कोस्टल रोड : नवी मुंबईला कनेक्टिव्हिटीचा नवा अध्याय



**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

आगामी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (एमटीएचएल) यांसह जेएनपीटी, नवी मुंबई सेझ आणि आम्र मार्ग या प्रादेशिक मार्गिकांदरम्यान कनेक्टिव्हिटी बळकट करण्याकरिता सिडकोतर्फे हाती घेण्यात आलेल्या पायाभूत सुविधा उपक्रमांपैकी उलवे किनारी मार्ग प्रकल्प हा सर्वांत महत्त्वाचा ठरणार आहे.

अंदाजे सात कि.मी. लांबी असणारा सहा पदरी (३+३) उन्नत उलवे किनारी मार्गाचा ५.८० कि.मी. चा टप्पा हा किनारी मार्ग असून ०.९०३ कि.मी. लांबीचा टप्पा हा जागतिक दर्जाच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला थेट जोडणारा एअरपोर्ट लिंक रोड आहे. कार्यान्वित झाल्यानंतर हा आधुनिक द्रुतगती महामार्ग नवी मुंबईला जागतिक व्यापार व कनेक्टिव्हिटीचे प्रवेशद्वार बनवण्यामधील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

एमएटीएचएल, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि आम्र मार्ग यांदरम्यान अखंड व सिग्नलविरहित प्रवास शक्य करण्यासह सध्या अस्तित्वात असलेल्या पाम बीच मार्ग, आम्र मार्ग आणि राष्ट्रीय महामार्ग ३४८ या मार्गांवरील ताण कमी करणे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. या सुधारित कनेक्टिव्हिटीमुळे दक्षिण मुंबई आणि नवी मुंबईमधील प्रवासाचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी होणार असून प्रवासी, लॉजिस्टिक्स आणि प्रादेशिक व्यापाराकरिताही हे फायदेशीर ठरणार आहे.

संपूर्ण मार्गावर उर्जा-कार्यक्षम एलईडी दिवे, अत्याधुनिक सिग्नल यंत्रणा, लेन मार्किंग, अॅन्टी-क्रॅश बॅरिअर आणि स्मार्ट वाहतूक व्यवस्थापन पायाभूत सुविधा असणार असून ज्याद्वारे प्रवाशांचा सुरक्षित व सुरळीत प्रवास सुनिश्चित होणार आहे.

# श्रीवर्धनच्या कुळकर्णी हॉलमध्ये वंदे मातरम्चे सामूहिक गायन

**श्रीवर्धन : बातमीदार**

शासकीय तंत्रनिकेतन व कौशल्य विकास विभागाच्या वतीने श्रीवर्धन शहरातील कुळकर्णी हॉल या ठिकाणी वंदे मातरम् या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल वंदे मातरम्चे सामूहिक गायन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी जवळजवळ ५०० विद्यार्थ्यांनी आपली उपस्थिती दर्शविली होती. श्रीवर्धन येथील र. ना. राऊत विद्यालयाचे विद्यार्थी, गोखले एज्युकेशन सोसायटीच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे विद्यार्थी, तसेच तंत्रनिकेतनचे विद्यार्थी, सदर सामूहिक वंदे मातरम् गायन कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तंत्रनिकेतनचे प्राचार्य उपासनी सर यांनी केले. या कार्यक्रमासाठी भाजपचे राज्य परिषद सदस्य मनोज गोगटे, पत्रकार संतोष चौकर, अपर्णा बंदरकर, साहित्यिक अनिता कांबळे, विप्राली पुसाळकर, राजे सर तर प्रमुख वक्ते म्हणून अॅड.संजीव डेगवेकर व्यासपीठावर उपस्थित होते. या वेळी अॅड. डेगवेकर यांनी वंदे मातरम् या गीताबद्दल आपले मनोगत अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने सादर केले.

या वेळी राज्यस्तरीय क्रीडापटू स्वरा गुरव



हिचादेखील सत्कार करण्यात आला. तर शासकीय तंत्रनिकेतन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी निबंध व चित्रकला स्पर्धेत भाग घेतला होता. त्यामध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा देखील या वेळी सत्कार करण्यात आला.

वंदे मातरम या विषयावरती एक लघु नाटिका देखील सादर करण्यात आली. ही नाटिका दर्पण जाधव, सिद्धांत भगत, सिद्धांत वाणी, सार्थक करंजकर, शिवम वाणी, अथर्व भोईर, अनिरुद्ध चौले, ओम तबीब आणि स्नेहा चौकर यांनी सादर केली.

पान १ वरुन

## नवीन पनवेलमध्ये देशभक्तीचा जागर

जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, अॅड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, चारुशीला घरत, उपाध्यक्ष गणेश कडू, माजी शहर अध्यक्ष अनिल भगत, जयंत पगडे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, भाजपचे पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, ब्रिजेश पटेल, कामगार आघाडीचे प्रदेश सचिव संजय भगत, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, माजी नगरसेवक मनोज भुजबळ, मनोहर म्हात्रे, बबन मुकादम, रवींद्र भगत, तेजस कांडपिळे, नरेश ठाकूर, समीर ठाकूर, सुनील बहिरा, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका सुशीला घरत, राजेश्री वावेकर, प्रिती जॉर्ज, वृषाली वाघमारे, माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील, जिल्हा सदस्य जितेंद्र म्हात्रे, अॅड. चेतन जाधव, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, युवा मोर्चाचे नवीन पनवेल अध्यक्ष मयूर कदम, पनवेल अध्यक्ष हिमेश बहिरा, रोहित जगताप यांच्यासह पदाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते.

स्वातंत्र्यलढ्यात कितीतरी सत्याग्रहींनी ब्रिटिश साम्राज्याची श्रृंखला तोडण्यासाठी कारागृहाचा मार्ग पत्करला. काळ्या पाण्याची शिक्षा अनुभवली, अनेकजण त्या वेदीवर हुतात्माही झाले. या साऱ्यांच्या मागे प्रेरणा होती ती वंदे मातरम् या तेजस्वी मंत्राची. या गीताची महती कितीही वर्षे उलटली, तरी ती सदैव प्रत्येक भारतीयाच्या कानात घुमत आहे. रवींद्रनाथ टागोर यांनी राष्ट्रीय महासभेच्या अधिवेशनात १८९६मध्ये प्रथम वंदे मातरम् ही रचना गायली होती. राष्ट्रीय महासभेने त्याच वर्षी हे गीत, त्यातील पहिली दोन कडवी राष्ट्रगीत म्हणून स्वीकारले आणि अनुसरले. या गीतावर आधारित एक सुंदर चित्रांकन प्रकाशित झाले होते. त्यातील समर्पकता आणि अर्थपूर्णता विहंगम आणि तेवढीच प्रेरक आहे.

प्रत्येक पिढीला देशासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा देणारा वंदे मातरम्चा अमर मंत्र आजही तेवढ्याच तेजाने घुमतो आहे. राष्ट्रभक्तीची ही ज्योत अखंडपणे प्रज्वलित ठेवणे खरी श्रद्धांजली सर्व शहीदांना आणि सेनानींना आहे. त्यामुळे या कार्यक्रमाचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याने विविध विद्यालयांतील तीन हजारहून अधिक विद्यार्थी, विविध संघटना, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक या उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## विश्वविजेत्या भारतीय संघातील महाराष्ट्राच्या खेळाडू, प्रशिक्षकांचा गौरव

या यशात खेळाडूंसह सपोर्ट स्टाफचे मोठे योगदान आहे याची दखल घेत मुख्य प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांना साडेबावीस लाख रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. या वेळी मुख्यमंत्र्यांनी, अमोल मुझुमदार तुम्ही फार मेहनत घेतली आहे. मी आताच भाकीत करतो, तुमच्यावर सिनेमा निघणार आहे, अशा शब्दांत त्यांचे कौतुक केले. याचबरोबर गोलंदाजी प्रशिक्षक आविष्कार साळवी, पद्मश्री डायना एदलजी, ॲनालिस्ट अनिरुद्ध देशपांडे आणि लॉजिस्टिक सपोर्ट अपर्णा गंभीरराव यांच्यासह मिहिर उपाध्याय, पूर्वा काटे आणि ममता शिररुल्ला यांचाही सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी या सर्व सपोर्ट स्टाफला अतिरिक्त ११ लाख रुपये देण्याची घोषणा केली.

# महाडमध्ये सामूहिक वंदे मातरम् गायन

**महाड : प्रतिनिधी**

वंदे मातरम या राष्ट्रीय गीताला ७ नोव्हेंबर रोजी १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने केंद्र शासनातर्फे देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर या वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रसेविका समिती, महाडच्या वतीने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सामूहिक वंदे मातरम गीतगायनाचे आयोजन करण्यात आले होते.


राष्ट्र सेविका समिती, महाडच्या वतीने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सामूहिक वंदे मातरम गीतगायनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात शहरातील विद्यार्थ्यांसह महिला, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून भारतमातेला वंदन करण्यात आले. त्यानंतर समितीच्या कार्यकर्त्यांनी वंदे मातरम गीताची ऐतिहासिक पार्श्वभूमी उपस्थितांना सांगितली.

यानंतर झालेल्या सामूहिक गीत गायनाने चौकातील वातावरण राष्ट्रभक्तीमय झाल्याचे दिसून आले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्र सेविका समितीच्या सर्व महिला पदाधिकारी आदींनी परिश्रम घेतले.

# ज्येष्ठ साहित्यिका फातिमा मुजावर यांचे निधन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येथील ज्येष्ठ साहित्यिका फातिमा बालेखान मुजावर यांचे ६ नोव्हेंबर रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७८ वर्षांच्या होत्या. त्यांच्यापश्चात पती बालेखान मुजावर, दोन मुले नुरुल हसन, नजमुल हुसेन, सुना, नातवंडे असा परिवार आहे.



फातिमा मुजावर मूळच्या कराडच्या. त्या नोकरीनिमित्त दीर्घकाळ पनवेलमध्ये वास्तव्यास होत्या. पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभागाच्या प्रमुख, तसेच प्र. प्राचार्य म्हणून त्या निवृत्त झाल्या होत्या. त्या उत्कृष्ट कवी, गझलकार होत्या. त्यांनी मराठी, हिंदी व उर्दू भाषांमधून विपुल काव्य, गझललेखन केले. त्यांचे रोशन, रौजन, पान मनाचे, गुलदस्ता, माँ की सौगात, आवाज-ए-वतन आदी कविता, गझलसंग्रह प्रकाशित आहेत. यासोतबच त्या अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य परिषद संस्थापक उपाध्यक्ष व पनवेल साहित्य संमेलनाच्य अध्यक्ष होत्या. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे.

## निवडक

### मोटरसायकलची चोरी
**पनवेल :** रेल्वेस्टेशन येथील पार्किंग जवळील साई मंदिराच्या बाजूला उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. रेवणनाथ पालवे यांनी त्यांची ३० हजार रुपये किमतीची बजाज कंपनीची एमएच १६ एसी ४७७१ डिस्कव्हर मोटारसायकल निळ्या काळ्या रंगाची ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### सराईत गुन्हेगार ताब्यात
**पनवेल :** शहर पोलिसांच्या कोम्बिंग कारवाई दरम्यान एका सराईत गुन्हेगारास पनवेल रेल्वेस्टेशन जवळील नवनाथ मंदिर मालधक्का झोपडपट्टी परिसरातून ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी इजाज शेख उर्फ अज्जू याने त्या परिसरात चहा टपरीवर चहा पिण्याकरिता थांबलेले महादेव देवकांबळे (वय ४५) यांच्या कडील ओपो कंपनीचा १२,५०० रुपये किमतीचा मोबाईल फोन जबरदस्तीने ओढून चोरून घेऊन गेला होता व चाकूचा धाक दाखविला होता. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने त्या परिसरात कोम्बिंग कारवाई करून आरोपीला ताब्यात घेतले आहे.

### करंजाडे येथे मराठी रंगभूमी दिन
**पनवेल :** करंजाडे येथे मराठी रंगभूमी दिन कार्यक्रम मायबाप प्रेक्षकांच्या साथीने झाला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ सिने लेखक दिग्दर्शक ज्येष्ठ लेखक दिग्दर्शक केदार शिंदे यांचे छोटे बंधू मंदार शिंदे, रेडिओ प्रतिनिधी आकाशवाणी मुंबईच्या परिणीता सावंत, रंगभूषा-नेपथ्य दिग्दर्शक झी २४ तास- एस्सेल ग्रुप मुंबईचे नंदादीप तांबे,सुप्रसिद्ध मोटिवेशनल स्पीकर एक उत्तम वक्ते रायगड जिल्हाचे रविकांत भोपी आदी उपस्थित होते. या वेळी उपस्थित मान्यवरांनी मराठी रंगभूमी दिनानिमित्त आपले विचार प्रगट केले. या कार्यक्रमाचे समन्वय आणि आयोजक महेश लाड हे होते.

### बांधकाम साहित्याची चोरी
**पनवेल :** अनेक वर्षांपासून बांधकाम सुरू असलेल्या खारघर येथील महापौर निवासाच्या इमारतीच्या कामासाठी मागवलेल्या वीज साहित्याची चोरी झाली आहे. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. या घटनेत एक लाख रुपयांची केबल व इतर साहित्य चोरण्यात आले आहे. खारघर येथील सेक्टर २१ येथील भूखंड क्रमांक १५१ येथे पनवेल महापालिका महापौर निवास बांधत आहे. या महापौर निवासाचे काम अंतिम टप्प्यात आहे. २८ ते ३१ ऑक्टोबर या दरम्यान ही चोरी झाल्याची नोंद गरजितसिंग रहलोवालिया यांनी दिली आहे. या चोरीत १२ तांब्याच्या पट्या आणि १८ तारा चोरी झाल्याचे म्हटले आहे.

# हायड्रो गांजाच्या तस्करीत आणखी दोघे अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

हायड्रो गांजाची तस्करी करणाऱ्या केयूर जयेश गोगरी या तरुणाला अटक करण्यात आल्यानंतर या तस्करीत सहभागी असलेल्या आणखी दोन तरुणांना नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली आहे. मोहम्मद आमान सलीम शेख (वय २०) व हित मुकेश पटेल (वय २२) अशी या दोघांची नावे आहेत. हे दोघेही केयूर गोगरी याच्याकडून हायड्रो गांजा घेऊन ते खारघरमधील मुलांना विक्री करत असल्याचे तपासात आढळून आले आहे.

खारघरमध्ये राहणारा केयूर गोगरी हा राहत्या घरातून अमली पदार्थाची विक्री करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर अमली पदार्थ विरोधी पथकाने ३० ऑक्टोबर रोजी खारघर सेक्टर-१९ मधील शिवसाई बिल्डिंगवर छापा मारला होता. त्या वेळी केयूर गोगरी याच्या कारमध्ये ८०० मिलीग्रॅम वजनाचा हायड्रो गांजा सापडला होता. अमली पदार्थ विरोधी पथकाने केयूर गोगरी याला एनडीपीएस कलमाखाली अटक केली होती. त्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडे अधिक केयूर गोगरी याच्या चौकशीत त्याने भांडुप येथे राहणाऱ्या शारीख याच्याकडून हायड्रो गांजा आणून त्याची विक्री करत असल्याचे कबूल केले आहे. शरीख हा थायलंड येथून छुप्या मार्गाने हायड्रो गांजा भारतात आणून त्याची आपल्या हस्तकांमार्फत विक्री करत असल्याचे तपासात आढळून आले आहे. त्यामुळे अमली पदार्थ विरोधी पथकाने शरीख व नोमान या दोघांचा शोध सुरू केला आहे.

चौकशी केली असता, तो सदरचा हायड्रो गांजा भांडुप येथे राहणारा त्याचा मित्र शारीख व उलवे येथे राहणारा नोमान याच्याकडून आणत असल्याची कबुली दिली. तसेच कळंबोली येथे राहणारा मोहम्मद आमान सलीम शेख व खारघरमध्ये राहणारा हित मुकेश पटेल हे दोघे केयूर गोगरी याच्याकडून हायड्रो गांजा घेऊन ते खारघरमधील मुलांना विकत असल्याचेदेखील त्याने सांगितले. त्यानुसार मोहम्मद अमान शेख व हित पटेल या दोघांना या प्रकरणात अटक करण्यात आल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिप निगडे यांनी दिली.

# मोरा पोलीस ठाण्याच्या कामासाठी निधीची गरज

## नवीन इमारतीच्या खर्चात दुपटीने वाढ



**उरण : रामप्रहर वृत्त**

मोरा सागरी पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी आवश्यक निधी वेळेत मिळत नसल्याने काम रखडले आहे. या कामाचा खर्च ८६ लाखांवरून आता एक कोटी ८२ लाखांपर्यंत पोहोचलेला आहे. तर काम रखडल्याने मोरा सागरी पोलिसांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

उरण तालुक्यासाठी तीन पोलीस ठाण्यांची निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये देशाच्या सुरक्षेला सागरी मार्गावरून अधिक धोक्याची शक्यता गृहीत धरून स्वतंत्रपणे कारभार पाहता यावा यासाठी मोरा सागरी पोलीस ठाणे उभारण्यात येत आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या पोलीस ठाण्याची जागा अत्यंत अपुरी पडत असल्याने कर्मचाऱ्यांना अनेक गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. नवीन इमारत उभारण्यासाठी वन, बंदर व महसूल विभागाकडे जागेची मागणी करण्यात आली होती. मात्र मोरा बंदराच्या जवळपास शासनाकडून जागेचा तिढा सोडवलेला नाही. अखेर मोरा येथील जुन्या जागेतच पोलीस ठाण्याचा गाडा हाकला जात आहे.

चार वर्षांपूर्वी मोरा सागरी पोलीस ठाण्याच्या नवीन इमारत उभारण्यासाठी शासनाने आवश्यकतेनुसार जागा उपलब्ध करून दिली. या बांधकामासाठी ८६ लाखांच्या निधीच्या तरतुदीनंतर कामाला सुरुवातही करण्यात आली. मात्र चार वर्षे काम रखडल्याने सुमारे २४८ चौमी क्षेत्रफळावरील एकमजली इमारतीच्या कामासाठी ८६ लाख ४८ हजार रुपयांचा निधी अपुरा पडत आहे. त्यामुळे इमारतीचे काम मागील चार वर्षांपासून अर्धवट अवस्थेत पडून आहे.

**मोरा सागरी पोलीस ठाण्याच्या इमारत बांधकामासाठी वाढीव निधीची मागणी करण्यात आली आहे, मात्र यापूर्वी मंजूर झालेला निधीच उपलब्ध झाला नसल्याने काम रखडले आहे. नवीन निधीची तरतूद झाल्यास काम मार्गी लागेल.**

**-नरेश पवार**, अतिरिक्त अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

# जनता विद्यालयात वाहतूक नियमांचे धडे

**कळंबोली : बातमीदार**



विद्यार्थी हेच आपल्या देशाचे भविष्य असून विद्यार्थ्यांनीच सर्व शासनाचे नियम समजावून घेतले तर भावी पिढी सक्षम होण्यास निश्चित मदत होईल, असे प्रतिपादन नवीन पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ यांनी आजीवली येथील जनता विद्या मंदिरात वाहतूक नियमांचे धडे देत असताना केले.

नवीन पनवेल वाहतूक शाखेने सामाजिक प्रबोधनाच्या योजनेतून आजिवली येथील जनता विद्यालयात शुक्रवारी जाऊन विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून विद्यार्थ्यांना वाहतुक नियमाचे माहिती देऊन वाहतूक नियमाचे पालन करणेबाबत प्रबोधन करण्यात आले. या वेळी माहिती देताना गाडी चालवताना सीट बेल्ट लावणे, दारू पिऊन गाडी चालवू नये. लेन कटिंग करू नये, वाहन चालवताना मोबाइल फोनचा वापर करू नये. ई., उलट्या दिशेने वाहने चालवू नयेत, वाहने रोडवर पार्क करू नयेत, विद्यार्थी तसेच विद्यार्थिनी यांनी लायसन येत नाही तोपर्यंत कोणताही वाहन चालू नये असे नियम समजून सांगण्यात आले. तसेच वाढत्या सायबर गुन्हेगारी बद्दल माहिती दिली व इंटरनेट वापरताना घ्यावयाची काळजी या बद्दल माहिती दिली.

मार्गदर्शन करण्यासाठी नवीन पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ, पोलीस हवालदार संजय गावडे उपस्थित होते.



**पनवेल : येथील महापालिकेतील सामान्य विभागाचे प्रफुल्ल घरत यांना वाढदिवसानिमित्त सहकारी कर्मचारीवृंदाने शुक्रवारी शुभेच्छा दिल्या.**

# पनवेल महापालिकेच्या उद्यान विभागाकडून बांबू लागवडीस प्रारंभ





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. पनवेल महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकडून दोन हजार बांबू लागवड करण्यात येणार आहे. उपायुक्त (उद्यान) नानासाहेब कामठे यांच्यामार्फत प्रतिकात्मक काही बांबू झाडांचे रोपण करून या वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

महाराष्ट्र बांबू धोरण २०२५, राष्ट्रीय बांबू मिशन (छ्इच्) तसेच महानगरपालिकेतर्फे विविध वृक्षांचे वृक्षारोपण अंतर्गत कळंबोली एन्ट्री पॉईंट (शिवसेना शाखा) ते केएलई कॉलेज पर्यंत मुख्य रस्त्याच्या बाजूला दोन हजार बांबूची लागवड करणे नियोजित आहे. अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा कार्यक्रम पनवेल महानगरपालिका उद्यान विभागामार्फत सुरू आहे.

गुरूवारी प्रतिकात्मक काही बांबू झाडांचे रोपण करून या वृक्षारोपण कार्यक्रमाचा सुरूवात करण्यात आली. या वेळी सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, उद्यान विभाग प्रमुख अनिल कोकरे, पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या अंतर्गत बुध्दा बेली या प्रजातीच्या दोन हजार बांबूच्या रोपांची लागवड करण्यात येणार आहे. हरित पनवेल समृद्ध पनवेल बनविण्याच्यादृष्टीने उद्यान विभागाच्यावतीने बांबू रोपणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या कार्यक्रमास उद्यान पर्यवेक्षक विशाल हुडेकर, सहाय्यक उद्यान पर्यवेक्षक महेश घोडसरे, सुमित बोडके यांचे या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.

# इनरव्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउनला डॉ. आशा देशपांडेंची सदिच्छा भेट




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी सेंटर, नवी पनवेल येथे इनरव्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउनतर्फे एक सुंदर आणि प्रेरणादायी कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास इंटरनॅशनल इनरव्हील क्लबच्या डिस्ट्रिक्ट चेअरमन डॉ. आशा देशपांडे यांनी भेट देऊन उपस्थित सदस्यांशी संवाद साधला तसेच मार्गदर्शन केले.

या वेळी क्लबच्या अध्यक्षा मेघना चांदोरकर, सचिव शुभांगी पाटील, खजिनदार डॉ. राजेश्री बागडे, तसेच ॲड. शुभांगी बहिरा, शुभदा भगत, डॉ. साधना गांधी, डॉ. जयश्री पाटील, आणि मान्यवर दर्शना भोईर व सुलोचना कल्याणकर उपस्थित होत्या.

कार्यक्रमात सभासदांनी करमणुकीसाठी गाणी सादर केली आणि देवी स्तुती करून वातावरण भक्तिमय केले. शुभांगी वालेकर यांनी क्लबचे बुलेटिन सादर केले.

'हॅपी स्कूल प्रकल्प' अंतर्गत शालेय उपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले. त्या शाळेच्या प्राचार्य मॅडम यांचा सत्कारही करण्यात आला. या वेळी डॉ. आशा देशपांडे यांनी क्लबच्या विविध उपक्रमांचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी सदस्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन दिले.

# माणकेश्वर मंदिरात भाविकांची गर्दी

**उरण : वार्ताहर**

त्रिपुरारी पौर्णिमा निमित्त उरण शहराच्या पश्चिमेस असलेल्या केगाव ग्रामपंचायत हद्दीतील माणकेश्वर येथील शंकर मंदिरात भक्तांनी मोठी गर्दी केली होती. या दिवशी यात्रा असल्याने उरण तालुक्यातील नागरिकांनी गर्दी केली होती.



केगाव-दांडामधील माणकेश्वर येथे सुमारे चारशे वर्षापूर्वी एका शेतकऱ्याला नांगरणी करतांना हे शिवलिंग सापडल्याचे येथील शेतकरी सांगतात. या मूर्तीची स्थापना करून छोटे खाणी कौलारू मंदिर उभारण्यात आले. त्यानंतर १९५३ मध्ये या मंदिराची नोंदणी झाली. १९९९मध्ये या मंदिराचा जीर्नोर्धार करून कॉनक्रिटचे मोठे मंदिर उभारण्यात आले. दरवर्षी त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त यात्रा असते. खेळणी, गृह उपयोगी वस्तू, खाण्याचे स्टॉल, हार, फुले यांची दुकाने थाटण्यात आली होती. सकाळपासूनच भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.



# गव्हाण विद्यालयात विद्यार्थी दिन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिवस 'विद्यार्थी दिन' म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता सहावी क या वर्गाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाच्या प्राचार्या व संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांचे हस्ते करण्यात आले.

या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रविंद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, इयत्ता सहावी क चे वर्गशिक्षक प्रमोद करावकर, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे, ज्युनिअर कॉलेजचे राजेंद्र चौधरी आणि इतर शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर.पाटील यांनी प्रास्तविकपर भाषणात विद्यार्थी दिनाचे महत्त्व विशद करताना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या शैक्षणिक,सामाजिक आणि राजकीय कार्याचा गौरव करतानाच विद्यार्थी म्हणून त्यांनी जीवनभर अंगिकारलेले अखंड व्रत शब्दांकित केले.





**पनवेल : तालुक्यातील दिघाटी ते श्री क्षेत्र पाली (बल्लाळेश्वर) पायी दिंडी निघाली. या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत यांनी मनोभावे दर्शन घेतले.**

# वंदे मातरम् १५० वर्षपूर्तीबद्दल उरण महाविद्यालयात कार्यक्रम

**उरण : रामप्रहर वृत**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अ जीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वंदे मातरम् गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सामूहिक वंदे मातरम गीत गायन कार्यक्रमाचे आयोजन केले गेले.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही व्ही गर्जे सर यांनी या वेळी भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील वंदे मातरम गिताची भूमिका विशद करून राष्ट्रवाद व देशभक्ती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर उपस्थित सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी वंदे मातरम गीताचे समूह गायन केले. इतिहास विभाग प्रमुख डॉ. एम.जी. लोणे यांनी वंदे मातरम गीताचा इतिहास सांगितला व भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर प्रकाश टाकला व उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ.दत्ता हिंगमिरे यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनात ग्रंथपाल श्याम धारासुरकर व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमात आय.क्यु.ए.सी समन्वयक डॉ. ए.आर. चव्हाण, प्रा. व्हि.एस इंदुलकर, डॉ. ए.के.गायकवाड, प्रा.आर.टी.ठावरे, प्रा.हन्नत शेख, प्रा.बाळु घोरपडे आदी मान्यवर व विद्यार्थी उपस्थित होते.

## संपादकीय

# आंदोलनांना मर्यादा हवी

मुंब्रा रेल्वे दुर्घटनाप्रकरणी दोन अभियंत्यांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला म्हणून गुरुवारी संध्याकाळी ऐन गर्दीच्या वेळी रेल्वे कर्मचाऱ्यांनी अकस्मात आंदोलन पुकारले. तासाभरानंतर आंदोलन मागे घेतले गेले, पण रेल्वेसेवा अचानक सुरू होऊन वेगाने आलेल्या रेल्वेगाडीखाली तीन प्रवाशांचा बळी गेला तर अन्य काही जखमी झाले. या भीषण अघटितासाठी कुणाला जबाबदार धरणार?

**मुंब्रा रेल्वेस्थानकानजीक जून २०२५मध्ये झालेल्या दुर्घटनेत पाच प्रवाशांचा मृत्यू आणि नऊ जण जखमी झाले होते. या प्रकरणी ठाणे रेल्वे पोलिसांनी मध्य रेल्वेच्या दोन अभियंत्यांविरोधात गुन्हा दाखल केला असता या कारवाईच्या निषेधार्थ मुंबई सीएसएमटी स्थानकात रेल्वे कर्मचारी युनियनकडून गुरुवारी संध्याकाळी ऐन गर्दीच्या वेळी आंदोलन करण्यात आले. रेल्वे कर्मचारी संघटना नेहमीच प्रवाशांना वेठीस धरतात. उपनगरी रेल्वे बंद झाल्यास लागलीच परिणाम दिसून येतो. प्रवाशांची गर्दी उसळते. व्यवहार ठप्प होतात. रेल्वे प्रशासनाला लागलीच आंदोलनाची दखल घेऊन चर्चेला सुरुवात करावी लागते. सकारात्मक आश्वासने पदरात पाडून घेतल्यावरच अशी आंदोलने स्थगित होतात, पण ऐन गर्दीच्या वेळी केलेल्या अशा आंदोलनाचे परिणाम किती भयावह असू शकतात याचे दर्शन गुरुवारी घडले. रेल्वे कर्मचाऱ्यांनी संध्याकाळी ऐन गर्दीच्या वेळी आंदोलन पुकारल्याने ठिकठिकाणी उपनगरी रेल्वेगाड्या ठप्प झाल्या. जवळपास तासभर प्रवाशांना रेल्वेवाहतूक का थांबली आहे याची कोणतीही कल्पना नव्हती. सँडहर्स्ट रोड स्थानकानजीक येऊन थांबलेल्या एका गाडीतील प्रवाशांना अशावेळी गाडीतून उतरून आपण किमान स्टेशन गाठून पुढच्या मार्गाला लागू असे वाटले आणि त्यांनी ट्रॅकवर उड्या टाकल्या. प्रवासी अंधारातच स्टेशनकडे चालत निघाले असताना समोरून वेगाने लोकल आली अन् क्षणात दोन प्रवाशांचा जागीच बळी गेला तर तीन जण गंभीर जखमी झाले. त्यातील आणखी एकाचा नंतर मृत्यू झाला. हे सारे अघटित अकस्मात केलेल्या आंदोलनामुळे घडले. रेल्वे कर्मचाऱ्यांना आपल्या न्याय्य हक्कांसाठी आंदोलन करण्याचा अधिकार आहे, पण आपला हा अधिकार बजावताना प्रवाशांना किती आणि कसे वेठीस धरले जाणार आहे याविषयी त्यांनी किमान काही संवेदनशीलता बाळगण्याची गरज नाही का? उपनगरीय रेल्वेचे प्रवासी रोज किती भीषण जीवघेण्या गर्दीतून प्रवास करतात याविषयी नव्याने काही सांगण्याची गरज नाही. या गर्दीपोटी काही प्रवाशांचा रोजच्या रोज बळी जात असतो. हे भीषण वास्तवही सामान्यांनी निमूट स्वीकारले आहे, पण गुरुवारच्या संध्याकाळी जे घडले ते अतिशय संतापजनकच म्हणावे लागेल. रेल्वे कर्मचाऱ्यांनी अकस्मात आंदोलन पुकारल्यामुळे काही प्रवाशांना जीव गमवावा लागला आहे. या भीषण घटनेस कुणाला जबाबदार धरले जाणार? निव्वळ रेल्वे कर्मचारीच नव्हे तर अन्य काही सार्वजनिक सेवांमधील कर्मचारीही कायम सामान्यांना वेठीस धरूनच आंदोलने करतात. त्यामुळे त्यांच्या आंदोलनांची परिणामकारकता वाढते व मागण्यांनुसार हवे ते पदरात पाडून घेणे सोपे जाते, पण या अशा आंदोलनांमुळे सर्वसामान्यांना किमान जिवास मुकावे लागू नये या दृष्टीने नियम आखले जाण्याची नितांत गरज आहे हे गुरुवारच्या दुर्घटनेने स्पष्ट झाले आहे. आंदोलन करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाईल असे रेल्वेकडून सांगितले गेले आहे, परंतु हे निव्वळ तात्कालिक कारवाईपुरते मर्यादित राहता कामा नये तर पुन्हा असे अघटित घडू नये म्हणून कर्मचाऱ्यांच्या आंदोलनांसाठी नियमांची चौकट आखली जाण्याची गरज आहे.**

# मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना



जागतिक हवामान बदल आणि अनियमित पर्जन्यमान यामुळे शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीचा सामना सातत्याने करावा लागत आहे. अशावेळी शेतकरीवर्गाला मदतीचा हात देऊन त्यांना दिलासा देण्यासाठी राज्यातील ७.५ एचपीपर्यंतच्या शेती पंप ग्राहकांना मोफत वीज देण्यासाठी मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना-२०२४ राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यात मार्च २०२४ अखेर ४७ लाख ४१ हजार इतके कृषी पंप ग्राहक असून या ग्राहकांना महावितरण कंपनीमार्फत वीज पुरवठा करण्यात येतो. एकूण ग्राहकांपैकी १६ टक्के कृषीपंप ग्राहक असून ऊर्जेच्या एकूण वापरापैकी सुमारे ३० टक्के ऊर्जेचा वापर कृषी क्षेत्रासाठी होतो. कृषी ग्राहकांचा सध्याचा एकूण वार्षिक वीज वापर ३९ हजार २४६ दश लक्ष युनिट आहेत. प्रामुख्याने या विजेचा वापर कृषी पंपास वीज पुरवठा करण्यासाठी होतो. सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण राज्यात कृषी वाहिन्यांवरील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना रात्रीच्या काळात १०/८ तास किंवा दिवसा आठ तास थ्री फेज विजेची उपलब्धता चक्राकार पद्धतीने करण्यात येते.

जून २०२४ महिन्यात झालेल्या पावसाळी अधिवेशनात उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पीय भाषणात मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना-२०२४ राबविण्याची घोषणा केली होती. या योजनेद्वारे शेतकऱ्यांवर येणाऱ्या वीजबिलाचा भार उचलण्याचे शासनाने ठरविले असून राज्यातील ४४ लाख तीन हजार शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना पूर्णतः मोफत वीज पुरविण्यात येणार आहे. याकरिता १४ हजार ७६० कोटी रुपये अनुदान स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महावितरण कंपनीच्या कृषी ग्राहकांना मदत करण्याच्या दृष्टीने व त्यांची थकबाकी वाढू न देण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना-२०२४ राबविण्यात येत आहे.

ही योजना पाच वर्षासाठी राबविण्यात येत असून त्याचा कालावधी एप्रिल २०२४ ते मार्च २०२९पर्यंत आहे, मात्र तीन वर्षाच्या कालावधीनंतर या योजनेचा आढावा घेऊनच पुढील कालावधीत योजना राबविण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. राज्यातील ७.५ एचपीपर्यंत शेतीपंपाचा मंजूर भार असलेले सर्व शेतीपंप ग्राहक या योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहतील.

**योजनेच्या अंमलबजावणीची पद्धत**

मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना ही योजना महावितरण कंपनीतर्फे राबविण्यात येते. शासनास विद्युत अधिनियम २००३, कलम ६५ अन्वये कोणत्याही ग्राहकांना अथवा ग्राहक वर्गवारीला अनुदान देवून त्यानुसार अनुदानीत वीज दर लागू करण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार वीज बिल माफ केल्यानंतर या वीजदर सवलतीपोटी रक्कम शासनाकडून महावितरण कंपनीला अग्रीम स्वरुपात वर्ग करण्यात येत आहे.

सध्या देण्यात येणारी वीजदर सवलत सहा हजार ९८५ कोटी रुपये अधिक वीज बिल माफीनुसार सवलत रुपये सात हजार ७७५ कोटी रुपये असे वार्षिक वीजदर सवलतीसाठी प्रतिवर्षी १४ हजार ७६० कोटी रुपये शासनाकडून महावितरण कंपनीला अदा करण्यात येणार आहे. मागेल त्याला सौर कृषीपंप देण्याचे धोरण शासनाकडून ठरविण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी वीजेची सुलभतेने उपलब्धता होऊ शकेल.

सुनील काकडे, मुख्य अभियंता, महावितरण पुणे परिमंडल, पुणे : राज्य शासनाने जाहीर केलेल्या मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना २०२४नुसार ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपाना मोफत वीजपुरवठा करण्यात येत आहे. पुणे जिल्ह्यात एकूण तीन लाख २९ हजार ४८८ शेतीपंप आहेत. त्यापैकी ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या एकूण दोन लाख ८४ हजार १९८ शेतीपंपधारक शेतकऱ्यांना या मोफत वीज योजनेचा लाभ होत आहे.

विकास किसन कापडी, मु. जारकरवाडी, पो. पारगाव, ता. आंबेगाव : आमचे तीन एचपी व पाच एचपीचे दोन शेतीपंप कनेक्शन आहेत. गेल्या दीडएक वर्षांपासून आमची लाईट बिलाची चिंता मिटली आहे. पूर्वी दर तीन महिन्याला बील यायचे. ते भरण्यासाठी पैशाची जुळवणी करताना दमछाक व्हायची. योजनेबद्दल सरकारचे धन्यवाद. तसेच सरकारने ही योजना कायमस्वरुपी सुरु ठेवावी.


सुनील अर्जुन करंडे, काठापूर बु., ता. आंबेगाव : माझे पाच एचपीचे कनेक्शन आहे. मागील वर्षांपासून आम्हाला शेतीचे बील येणे सरकारच्या बळीराजा मोफत योजनेमुळे बंद झाले आहे. या योजनेबद्दल मी समाधानी असून, सरकारचा आभारी आहे. दिवसा वीज देण्यासाठीही सरकारचे प्रयत्न सुरू आहेत.

**संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

# महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व पु.ल. देशपांडे

महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व असलेले पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे म्हणजेच पु.ल. देशपांडे एक लोकप्रिय मराठी विनोदी लेखक तसेच शिक्षक, अभिनेते, पटकथालेखक, संगीतकार, नाटककार, कवी, गायक आणि वक्ते ही होते.

पु.ल.देशपांडे यांचा जन्म मुंबईतील गावदेवी या भागात गौड सारस्वत ब्राह्मण कुटुंबामध्ये ८ नोव्हेंबर १९१९ रोजी झाला. त्यांचे आजोबा वामन मंगेश दुभाषी हे एक कवी व साहित्याचे जाणकार होते. त्यांचे बालपण जोगेश्वरी येथील सारस्वत कॉलनीत गेले तसेच त्यांनी पार्ले टिळक विद्यालयात शालेय शिक्षण घेतले. त्यांनी मुंबईतील इस्माईल युसुफ कॉलेजातून इंटर व सरकारी लॉ कॉलेजमधून एलएलबी ची पदवी घेतली आणि कलेक्टर कचेरी व प्राप्तीकर विभागात काही काळ नोकरी केली. त्यापूर्वी ते पेट्रोल रेशनिंग ऑफिसमध्ये कारकून आणि ओरिएंटल हायस्कूलमध्ये शिक्षक होते. पुण्याला आल्यावर त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमधून बीए आणि नंतर एमए केले.



फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये असताना देशपांडे यांनी नाटकांतून भूमिका करायला सुरुवात केली. १९३७पासून नभोवाणीवर पु.ल.देशपांडे छोट्या मोठ्या नाटिकांत भाग घेऊ लागले होते. १९४०च्या दशकात त्यांनी साहित्यक्षेत्रात पदार्पण केले. १९४६ साली त्यांचे सुनीताबाईंशी विवाह झाले. १९४७ ते १९५४ या काळात त्यांनी चित्रपटांमध्ये आणि चित्रपटांसाठी काम केले. देशपांडे यांनी संगीत दिले आणि चित्रपटातील गाणीदेखील गायले. 'पुलं'ना घरात खूप वाचन करायला मिळाले तर रेडिओवरील संगीत ऐकायलादेखील मिळाले. त्यांच्या घरी संगीताच्या बैठकाही होत असत अशात ते घरीच बाजाची पेटी शिकले. वडिलांच्या मृत्यूनंतर ते संगीत व अन्य शिकवण्या करू लागले. १९५५मध्ये पु.ल. देशपांडे आकाशवाणीत नोकरीला लागले. आकाशवाणीसाठी त्यांनी अनेक श्रुतिका लिहिल्या आणि भाषणे दिली. नंतर ते आकाशवाणीवर प्रमुख नाट्यनिर्माता झाले. बदलीवर दिल्लीला गेले. १९५८मध्ये 'पुलं'ना आकाशवाणीने युनेस्कोच्या शिष्यवृत्तीवर मीडिया ऑफ मास कम्युनिकेशन या अभ्यासक्रमासाठी लंडनला बीबीसीकडे पाठवले. १९५९मध्ये देशपांडे भारतातील पहिले दूरचित्रवाणी कार्यक्रम निर्माते झाले. दिल्ली दूरदर्शनवर सुरू झाले त्यावेळचा पहिला कार्यक्रम 'पुलं'नी निर्मिला होता. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

### लॅपटॉपच्या स्क्रीनवरची धूळ अशी करा साफ...

लॅपटॉप हा आपल्या रोजच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. कामाच्या निमित्ताने आपण रोज लॅपटॉप उघड-बंद करतो. अनेकदा लॅपटॉप उघडला की त्यावर भरपूर धूळ बसलेली दिसते. अशावेळी आपण टिश्यू पेपर अथवा एखादा कपडा घेऊन लॅपटॉपची स्क्रीन पुसू लागतो, मात्र असं करणं चूक आहे. लॅपटॉपची स्क्रीन अत्यंत नाजूक असल्यामुळे, तिची साफसफाई करताना कठोर रसायने किंवा जास्त दाब वापरल्यास तिचे मोठे नुकसान होऊ शकते. त्यामुळे, तुमचा लॅपटॉप पुन्हा लखलखीत दिसावा यासाठी तो साफ करताना काही गोष्टी जाणून घेणे गरजेचे आहे.




लॅपटॉपच्या स्क्रीनची साफसफाई सुरू करण्यापूर्वी दोन गोष्टींकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. सर्वप्रथम लॅपटॉपला पॉवर सोर्समधून काढा आणि तो पूर्णपणे बंद करा. जर लॅपटॉप नुकताच वापरून बंद केला असेल आणि गरम असेल, तर त्याला पूर्ण थंड होऊ द्या. गरम स्क्रीन पुसल्यास ती खराब होण्याची शक्यता जास्त असते.

तुमच्या लॅपटॉपवर असलेल्या डागांनुसार तुम्ही योग्य साधने वापरू शकता. स्क्रीनवरील सामान्य धूळ आणि हलके डाग काढण्यासाठी मायक्रोफायबर कापडाचा वापर करा. हे कापड अत्यंत मऊ असल्याने स्क्रीनवर ओरखडे पडत नाहीत.

जर स्क्रीनवर काही चिकट आणि जुने डाग असतील, तर मायक्रोफायबर कापडावर थोडे डिस्टिल्ड वॉटर घेऊन हळूवारपणे पुसा. साधे नळाचे पाणी वापरणे टाळा, कारण त्यात क्षार असू शकतात. याव्यतिरिक्त कॉर्नर आणि कडांना अडकलेली धूळ काढण्यासाठी एअर कॉम्प्रेसरचा काळजीपूर्वक वापर करा. लॅपटॉपसाठी बनवलेल्या क्लिनिंग वाइप्सचा पर्यायदेखील निवडू शकता. साफसफाई पूर्ण झाल्यावर, लॅपटॉप पुन्हा सुरु करण्यापूर्वी स्क्रीन पूर्णपणे कोरडी झाली आहे, याची खात्री करा.

लॅपटॉप स्क्रीन नाजूक असल्याने काही वस्तू वापरणे कटाक्षाने टाळले पाहिजे. पेपर टॉवेल किंवा टिश्यू पेपर वापरू नका, कारण त्यांचे तंतू स्क्रीनवर बारीक ओरखडे पाडू शकतात तसेच अल्कोहोल किंवा अमोनिया आधारित क्लीनर वापरणे टाळा. हे कठोर रसायन स्क्रीनवरील संरक्षक थर काढून टाकू शकतात. याशिवाय, क्लीनिंग लिक्विड कधीही थेट स्क्रीनवर स्प्रे करू नका. हे द्रव कडांमधून आत जाऊन अंतर्गत सर्किट्स बिघडवू शकते, ज्यामुळे लॅपटॉपचे मोठे नुकसान होते.

# भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी



**निमित्त**

लालकृष्ण अडवाणी यांचा आज जन्मदिवस. लालकृष्ण अडवाणींचा जन्म ८ नोव्हेंबर १९२७ रोजी आता पाकिस्तानमध्ये असलेल्या कराची येथे झाला. लालकृष्ण अडवाणी भारतीय जनता पार्टीचे संस्थापक सदस्य आणि २००२ ते २००४पर्यंत भारताचे उपपंतप्रधान होते.

लालकृष्ण अडवाणी हे भारताच्या राजकारणातले महत्त्वाचे राजकारणी आणि भाजपचे ज्येष्ठ नेते आहेत. ते भाजपच्या सहसंस्थापकांपैकी एक आहेत. ते उजव्या विचारसरणीच्या हिंदू राष्ट्रवादी संघटनेचे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दीर्घकाळ सदस्य आहेत. २०१५ मध्ये त्यांना भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान पद्मविभूषण देऊनही सन्मानित करण्यात आले होते.

लालकृष्ण अडवाणी यांचा जन्म किशनचंद डी. अडवाणी आणि ग्यानी देवी यांच्या पोटी कराचीमध्ये ८ नोव्हेंबर १९२७ रोजी सिंधी हिंदू उद्योगपती कुटुंबात झाला. त्यांनी आपले प्रारंभिक शिक्षण सेंट पॅट्रिक्स हायस्कूल, कराची, सिंध येथून घेतले आणि नंतर सरकारी महाविद्यालय हैदराबाद, सिंधमध्ये प्रवेश घेतला. लालकृष्ण अडवाणी वयाच्या १४व्या वर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात दाखल झाले आणि कराची शाखेचे प्रचारक (पूर्णवेळ कार्यकर्ता) बनले आणि तेथे विविध शाखादेखील विकसित केल्या. फाळणीनंतर ते कुटुंबासह भारतात स्थलांतरित झाले आणि मुंबईत स्थायिक झाले जेथे त्यांनी बॉम्बे युनिव्हर्सिटीच्या सरकारी लॉ कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि तेथून कायद्याची पदवी घेतली. फाळणीनंतर अडवाणींना अलवर, राजस्थान येथे पाठवण्यात आले. अलवर व्यतिरिक्त त्यांनी भरतपूर, कोटा, बुंदी आणि झालावाड जिल्ह्यातही काम केले. त्यांनी के. आर. मलकानी यांना आरएसएस साप्ताहिक, ऑर्गनायझरच्या संपादनातही मदत केली.


लालकृष्ण अडवाणी, श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सहकार्याने स्थापन केलेल्या भारतीय जनसंघात अडवाणी दाखल झाले. अडवाणी यांची राजस्थानमधील जनसंघाचे तत्कालीन सरचिटणीस एसएस भंडारी यांच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली होती. संसदीय कामकाज पाहण्यासाठी त्यांना दिल्लीत हलवण्यात आले आणि लवकरच ते सरचिटणीस आणि नंतर जनसंघाच्या दिल्ली युनिटचे अध्यक्ष बनले.

लालकृष्ण अडवाणी यांनी १९९०मध्ये गुजरातमधील सोमनाथ ते उत्तर प्रदेशातील अयोध्येपर्यंत 'रथयात्रा' सुरू केली. यात्रेचा उद्देश 'कारसेवक' किंवा स्वयंसेवकांना एकत्र करणे हा होता. २००९च्या निवडणुकीसाठी, अडवाणी यांना भाजपने पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून नियुक्त केले होते, कारण ते वाजपेयींनंतर भाजपचे सर्वांत शक्तिशाली नेते होते. २०१०मध्ये त्यांची एनडीएचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

२०१४मध्ये लालकृष्ण अडवाणी मुरली मनोहर जोशी आणि अटलबिहारी वाजपेयी यांच्यासह भारतीय जनता पक्षाच्या मार्गदर्शक मंडळात दाखल झाले. आता त्यांनी पक्षाच्या सर्व राजकीय घडामोडीपासून अलिप्तता घेतली असली तरी भारतीय जनता पक्षाची रुजवात करणारे नेते म्हणून आजही त्यांच्याकडे मोठ्या आदराने पहिले जाते.

**(साभार : ज्ञानशाळा)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### चष्म्याचा नंबर कमी होण्यासाठी व्यायाम



हल्ली प्रत्येकाचाच स्क्रिन टाईम खूप वाढला आहे. कामामुळे कित्येकांना तासनतास लॅपटॉप, डेस्कटॉपसमोर बसावं लागतं. कामाचे तास संपल्यानंतर मोबाईल, टीव्ही अशा स्क्रिन समोर असतातच. लहान मुलंही त्याला अपवाद नाहीत. अनेकांचे ऑनलाईन क्लास मोबाईल किंवा लॅपटॉपवर होतात. शिवाय मुलं टीव्हीसुद्धा खूप पाहतात. याचा परिणाम त्यांच्या डोळ्यांवर होतो आहे आणि कमी वयातच मुलांना चष्मा लागतो आहे. एवढंच नाही तर मुलांमध्ये चष्म्याचा नंबरही खूप पटापट वाढत जातो.

वरील सगळं टाळायचं असेल, तर मुलांकडून काही व्यायाम नियमितपणे करून घ्या. यामुळे त्यांचा चष्म्याचा नंबर वाढणार नाही तसेच नजर सुधारण्यासही मदत होईल.

जेव्हा तुम्ही हे डोळ्यांचे व्यायाम कराल तेव्हा सगळ्यात पहिला नियम हा की स्वच्छ हवेत, मोकळ्या जागी आणि सुर्यप्रकाश येईल त्याठिकाणी बसून हे व्यायाम करा.

१. पहिला व्यायाम म्हणजे डोळे घट्ट मिटा आणि त्यानंतर पुन्हा उघडा. अशी डोळ्यांची उघडझाप साधारण १० वेळा करा आणि असे पाच राऊंड करावे.

२. डोळ्यांची उघडझाप करण्याचा व्यायाम झाल्यानंतर दोन्ही तळहात एकमेकांवर घासा आणि नंतर ते डोळ्यांवर ठेवा. हातांमध्ये निर्माण होणारी उब डोळ्यांसाठी अतिशय चांगली असते. असे तीन ते चार वेळा करा.

३. यानंतर अगदी सावकाशपणे मान न हलवता डोळे उजवीकडून डावीकडे आणि डावीकडून उजवीकडे अशा पद्धतीने गोलाकार फिरवा. असं साधारण दोन्ही बाजूंनी पाच-पाच वेळा करा.

४. यानंतर उजवा किंवा डावा हात समोर करा. हात खांद्याच्या रेषेत सरळ असू द्या. त्यानंतर हाताच्या अंगठ्याकडे नजर केंद्रित करा. अंगठा डावीकडे, उजवीकडे असा प्रत्येकी पाच-पाच वेळा फिरवा आणि ते करत असताना अंगठ्याकडेच नजर केंद्रित करा.

५. यानंतर अंगठा वर आणि खाली असा प्रत्येकी पाच-पाच वेळा करा. हे करतानाही अंगठ्याकडे नजर स्थिर ठेवा.


एकंदर डोळ्यांचे काही छोटे छोटे व्यायाम करून दृष्टीमध्ये सुधारणा आणता येऊ शकते. अर्थात, काही गोष्टी कटाक्षाने पाळणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

# नुकसानभरपाई द्यावी; मुरूडच्या स्थानिक शेतकरीवर्गाची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात भातशेतीचे मोठे नुकसान झाले आहे. भातपीक अतिवृष्टीमुळे जमिनीत गाडले गेले. शेतकरीवर्ग चिंतातुर असून आता शासनाकडून मदत मिळावी अशी मागणी करू लागला आहे. वर्षभरात एकमेव पीक नष्ट झाल्याने गरीब शेतकरी आता आपले कसे होणार या समस्येने विचलित झाला आहे. मुरूड तालुक्यात आतपर्यंत ९० टक्के पंचनामे पूर्ण झाले आहेत, परंतु मदत मात्र खात्यात जमा न झाल्याने शेतकरी चिंतातुर झाला आहे.

सध्याच्या घडीला अवकाळी पावसामुळे भात पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. कारण पावसामुळे शेतात पाणी साचून पिके कुजली आहेत, भाताची काढणी रखडली आहे आणि कापलेला भात शेतात भिजत आहे. शेतकऱ्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असून, शेतकऱ्यानि वर्षभर



खायचे काय आणी कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा अशी समस्या शेतकऱ्यांन समोर निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांना शासनाकडून नुकसानभरपाईची मागणी आहे.

पिकाची नासधूस ही वन्य जीवसुद्धा करीत आहेत. पावसामुळे शेतात पाणी साचल्याने उभी भात शेती कुजून गेली आहे. हाताशी आलेले पीक वाया गेल्यामुळे शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरले असून आर्थिक नुकसान झाले आहे.

शासनाने तातडीने पंचनामे करून तत्काळ नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत. याबाबत नांदगाव येथील स्थानिक शेतकरी सचिन पाटील यांनी सांगितले की, पंचनामे पूर्ण झाले आहेत, परंतु शासनाकडून मदतीचा हात कधी मिळणार याकडे संपूर्ण शेतकरी वृंद लक्ष ठेवून आहेत. शासनाने गरीब शेतकरी यांच्याकडे लक्ष देऊन तातडीने मदत देऊन शेतकरी वर्गाला दिलासा द्यावा, अशी मागणी या वेळी त्यांनी केली आहे.

मुरूड तहसीलदार आदेश डफळ यांनी सांगितले की, मुरूड तालुक्यातील किमान ९० टक्के पंचनामे पूर्ण झाले आहेत. पंचनामे करण्याचे काम सुरू आहे. शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याबाबतचा शासनाचा अध्यादेश अद्यापर्यंत निर्गमित झालेला नाही. जेव्हा अध्यादेश येईल तेव्हा तातडीने मदत मिळण्यास सुरुवात होणार आहे.

# खोपोलीत मुस्लिम बांधवांचा शिवसेनेत प्रवेश



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील क्रांतीनगर मधील मुस्लिम बांधवानी शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश झाला. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते बेबीशेठ स्याम्युअल व त्यांचे पुत्र रॉबिन स्यामुअल यांच्या नेतृत्वात हा पक्षप्रवेश झाला. या वेळी कर्जत खालपूरचे आमदार महेंद्र थोरवे, ज्येष्ठ नगरसेवक मोहन औसरमल, कुलदीपक शेंडे,माजी नगरसेविका जीनी स्यामुअल, प्रचारप्रमुख शेखर जाभंळे आदी उपस्थित होते.

क्रांतीनगर येथील अयुब खान, श्रीकांत कांबळे, मन्नूदिन शेख, मंगेश सकापाळ, शिबू शेख, नईम शेख आदींनी प्रवेश केला. या वेळी इच्छुक उमेदवार रॉबिन सॅम्युअल यांनी शिवसेना शिंदे गटात मोठ्या प्रमाणात सर्व समाजाचे नागरिक प्रवेश घेण्यात इच्छुक असून त्यांना टप्प्याटप्प्याने प्रवेश देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# एक्सप्रेस वेवर ट्रक उलटला

## चालक आणि क्लीनर गंभीर जखमी

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई पुणे एक्सप्रेसवेवर काल एका ट्रकचालकाचे ट्रक वरील नियंत्रण सुटल्याने, त्याने समोरील कठड्याला जोरदार धडक दिल्याने ट्रक पलटी झाल्याने भीषण अपघात झाला, या अपघातात ट्रकमधील चालक आणि क्लीनर हे दोघे अडकून गंभीर जखमी झाले आहेत.

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरून ट्रक क्रमांक (एचएच १० सीआर २९५३) हा चालक पुण्याहून मुंबईकडे घेऊन जातं असताना, तो मॅजिक पॉईंटजवळ आला असता चालकाचे ट्रक वरील नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील सुरक्षा कठद्याला



जोरदार धडक देऊन ट्रक पलटी झाला या अपघातात ट्रक मधील चालक तुषार विवेक तुपे, (रा.फलटण) आणि क्लीनर प्रशांत घाडगे (रा.फलटण) हे दोघे अडकून गंभीर जखमी झाले आहेत

या अपघाताची माहिती मिळताच बोरघाट पोलीस, हेल्प फाउंडेशन आयआरबी टीम मृत्युंजय टीम आदी तत्काळ घटनास्थळी दाखल होत ट्रकमधील अडकलेल्या दोघांना बाहेर काढून त्यांना तत्काळ एमजीएम रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

# घरपट्टीवाढीच्या विरोधात मोर्चा

## पोलादपूरकर आक्रमक

**पोलादपूर :** सलग दुसऱ्यावर्षी घरपट्टीवाढीचा तडाखा देणाऱ्या नगरपंचायत पोलादपूरविरोधात आक्रोश मोर्चा करण्यासाठी पोलादपूरकर नागरिक एकवटणार असून डॉक्टर काका करमरकर यांच्या श्रीगणेश मंदिरामध्येच या विरोधाचा श्रीगणेशा शहराच्या विविध भागातील २५ ग्रामस्थांच्या उपस्थितीत करण्यात आला. या वेळी सर्वाधिक गाळे असणारे दिलीप साबळे यांनी नगरपंचायतीवर धडक आक्रोश मोर्चा नेण्याचा सल्ला उपस्थितांना दिला.

पोलादपूर नगरपंचायतीतर्फे गेल्यावर्षी घरपट्टीवाढीच्या नोटीसा बजावण्यात आल्यानंतर अनेकांनी हरकती घेतल्या. या हरकतींवर कोणत्याही प्रकारचे उत्तर न देणाऱ्या नगरपंचायतीने यंदा पुन्हा नागरिकांना पूर्वीपेक्षा अधिक घरपट्टी लावण्यासंदर्भात नोटीसा बजावल्या आहेत.

# कोर्लईत मच्छी उतरवण्यासाठी होणार सुविधा; कामाचे भूमिपूजन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

कोटयावधीचा विकास निधी मतदारसंघाचा आमदार म्हणून आणला असून अनेक जेट्टी, मंदिरे, बांधकाम केले आहेच, परंतु मुरूड तालुक्यातील दोन्ही जिल्हा परिषदेतील गावागावात, ग्रामपंचायतीत भरघोस निधी उपलब्ध करून सर्वांगीण विकास करण्याचा निश्चित प्रयत्न केला आहे, असे ठोस प्रतिपादन आमदार महेंद्र दळवी यांनी कोर्लई येथे केले. या वेळी कोर्लई येथील दत्त मंदिराच्या नुतनीकरणासाठी निश्चित निधी उपलब्ध करेन, असे आश्वासनसुध्दा दिले.

मुरूड तालुक्यातील कोर्लई येथे मच्छीमार व्यवसायात समुद्रातून आलेल्या होंडीतील मच्छी उतरणीचा होत असलेली समस्या दूर करण्यासाठी कोळी बांधवाच्या मागणीने मच्छी उतरणी केंद्राचा-जेट्टीचा भुमिपुजन गुरूवार ६ नोव्हेंबर २०२५ रोजी सायकांळी ४.०० वाजता आयोजीत करण्यात आला होता, कोर्लई दत्त मंदिराचे समोरील समुद्र किनारी ३० बाय ३०चा चौथरा व तेथून १८० मीटर समुद्रात आत जेट्टी कामास सुमारे सहा कोटी ४८ लाख रूपये निधी प्रधानमंत्री मच्छसंपदा अंतर्गत मंजूर करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास आमदार महेंद्र दळवी यांची प्रमुख उपस्थितीसह भाजप जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, शिवसेना जिल्हाप्रमुख राजा केणी, उपजिल्हा प्रमुख भरत बेलोसे, मुरूड शिवसेना तालुका प्रमुख निलेश घाटवळ, ज्येष्ठ कार्यकर्ते सी.एम. ठाकूर, युवासेना तालुकाप्रमुख अमोल लाड, उपतालुका प्रमुख विकी वेगस, रेवदंडा ग्रा.प. सरपंच प्रफुल्ल मोरे, शिवसेना उपतालुका प्रमुख भगिरथ पाटील, काकळघर ग्रा.प.सरपंच स्वस्तिक ठाकूर, तळेखार ग्रा.प. सरपंच विजय घाणेकर, बोर्ली ग्रा.प. सरपंच सपना जायपाटील, सुरेश पालवणकर, सुरेश ठाकूर, शिवसेना जिल्हा महिला प्रमुख तृप्ती पाटील, मुरूड तालुका महिला संघटिका निर्मला म्हात्रे, महिला विभाग संघटक वैशाली रोटकर, जयश्री पाटील, रेखा डोलकर, नंदिनी चोरढेकर, अपर्णा पाटील, रसिका कणगी, सुवर्णा पाटील, लक्ष्मीबाई बलकवडे, सिध्दाई भोसले, तसेच दत्ताराम पाटील, जयेश म्हात्रे, प्रभाकर मुरूडकर, प्रकाश बलकवडे, प्रशांत भोय, उपेंद्र बलकवडे, संतोष चोरढेकर, लक्ष्मण मुरूडकर, संजय नवघरकर आदी मोठया संख्येने कोर्लई ग्रामस्थ व महिला यांची उपस्थिती होती.




## जाहिर प्रसिद्धीकरण

पुढे नमुद केलेली सोसायटी ग्रीन वूड फेज वन कानपोली हेदुटाणे ह्या सोसायटी मध्ये सोलर एनर्जी पॅनल बसवण्याचे आहे तरी इच्छुक सरकार मान्य ठेकेदारानी आपली निविदा दिनांक १०/११/२०२५ पर्यंत सोसायटी ई मेल वरती मेल करावयात
greenwoodsocietyphase1@gmail.com

sd/- Chairman | sd/- Secretary | sd/- Treasurer
GREENWOOD ESTATE PHASE - 1 CHS LTD.
Survey No. 10/4, 10/5, 11/3, 12/2, 13/3 & 16/3, Village - Hedutane, Post-Padghe, Tal. Panvel, Dist. - Raigad - 410 208.


## उरण नगरपरिषद

तालुका-उरण, जिल्हा-रायगड

### जाहीर सूचना

मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.३/का-८ दिनांक १६ जुलै,२०२५ अन्वये उरण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता मतदार यादीचा कार्यक्रम निश्चित केल्याप्रमाणे व मा. राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र.रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.०९/का-६ दिनांक ३०/०९/२०२५ अन्वये अधिसूचित केलेल्या दिनांकास म्हणजे ०१/०७/२०२५ रोजी अस्तित्वात आलेली १९० उरण विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादी वरुन मा. जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील आदेश क्र.नपाप्र. कार्या-४/न.प.सा.नि/मतदार यादी कार्यक्रम/२०२५/२१२ दिनांक ०६/१०/२०२५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार उरण नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकी करिता १ ते १० बहुसदस्यीय प्रभागाच्या मतदान केंद्राची यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या तयार करण्यांत आल्या आहेत. सदरच्या मतदार याद्या नागरीकांना पाहण्यांसाठी दिनांक ०७/११/२०२५ खालील ठिकाणी प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. सदर याद्या निम्नलिखित स्थळी उपलब्ध असतील.

१) उरण नगरपरिषद कार्यालय नोटीस बोर्डावर २) तहसिल कार्यालय उरण जि.रायगड ३) उरण नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र.३ मोरा-उरण ४) उरण नगरपरिषद संकेतस्थळ https://mahaulb.in/Portal Site/#/app/home

उरण नगरपरिषद कार्यालय
उरण, दिनांक ०७/११/२०२५

जा.क्र. उनप/सा.प्र.वि./केंद्र.
नि.यादी/२०२५/२०२५-२०२६

**सही/-**
**(समीर जाधव)**
**मुख्याधिकारी**
उरण नगरपरिषद, उरण

## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

### जाहीर नोटीस सूचना

### शुध्दीपत्रक

संदर्भ-जाहिर नोटीस सुचना प्रसिध्दी दिनांक ०४/११/२०२५ रोजी दै. कृषिवल.
महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | A. T. Anuse, Superitending Engineer CIDCO (Airport), Office.- 2nd Floor, Tower No. 10, Belapur Station, CBD Belapur, Navi Mumbai 400614. | ०९ करंज, २३ काजु, १० सप्तपर्णी, ०७ पेरू, ०१ काशिद, ०८ साग, ०५ रेन ट्री. ०३ देशी बदाम, ०७ पिचकारी, ०४ गुलमोहर, ०५ कदंब, ०१ निम, ०८ बहावा, ०४ मोठी महोगनी, १३ कांचन, ०१ फणस, ०९ सोनमोहर, ०२ गुलाबी टॅबेबिया, ०१ मार्खमीया, ०४ उंबर, ०२ आंबा, ०१ पिंपळ, ०१ वावळ, ०१ भेंडी व ०१ बारतोंडी अशी **१३१ झाडे पुनर्रोपण करणे** आणि ३४ सुबाभूळ, ०४ सोनमोहर, ०१ करंज, ०४ निम, ०१ देशी बदाम, ०२ बारतोंडी, ०१ भेंडी, ०९ गुलमोहर, ०४ आंबा, ०१ ऑस्ट्रेलियन बाबुळ, ०१ बोर, ०७ चारकोल ट्री, ०२ जांभूळ, १२ कदंब, ०१ काटेसावर, ०१ पिचकारी, ०१ चेरी, ०६ उंबर व ०१ विलायती चिंच अशी **९३ झाडे तोडणी करणे.** | पनवेल महानगरपालिका हद्दीतील तळोजा MIDC जवळील मौजे चाल येथे २२४ झाडे पनवेल महानगरपालिकेच्या विद्यमान घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाला लागून भविष्यातील विस्तारासाठी प्रस्तावित अतिरिक्त भूखंडाभोवती परिघीय मार्ग व S.W. Drain चे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/पुनर्रोपण करण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस/पुनर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ७/११/२०२५

जा.क्र.PMC-PARK/576/2025-PTAD

**सही/-**
**(स्वरूप खारगे)**
उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी
पनवेल महानगरपालिका

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांच्या लाभांत मुळ जमिन मालक **(१) श्री. अनंत वामन पाटील, (२) मयत कै. तुळशीराम अनंत पाटील यांचे वारस व उत्तराधिकारी (२:१) श्रीमती. कुसूम तुळशीराम पाटील, (२:२) श्री. रजीत तुळशीराम पाटील, (२:३) श्री. शेखर तुळशीराम पाटील आणि (२:४) श्री. धनंजय तुळशीराम पाटील हे सर्व मयत कै. धाकुलबाई वामन पाटील यांचे वारस व उत्तराधिकारी यांनी** त्यांच्या मालकी हक्कातील **मौजे जासई, ता. उरण जि. रायगड** येथील जमिन मिळकती हया मेट्रो सेंटर उरण यांनी न्हावा शेवा बंदर या प्रकल्पाकरीता संपादीत करुन त्यामोबदल्यापोटी त्यांच्या लाभांत **मे. सिडकोकडील १२.५ टक्के योजनेनुसार एकत्रिकरणाव्दारे संचिका क्र. जे.एन.पी.टी. ११८ अंतर्गत जे.एन.पी.टी. नोड, ता. उरण, जि. रायगड येथील सेक्टर आय-४ मध्ये इरादित करण्यात आलेला भुखंड क्र. ९ चे एकूण क्षेत्र २०३७ चौ. मी. पैकी त्यांच्या हिश्यातील १९६३ चौ. मी. क्षेत्राचा भुखंड** हा मे. सिडकोमार्फत भुखंड हस्तांतरणासंदर्भातील पूर्वपरवानगी प्राप्त करुन हस्तांतरित करुन देण्याचे मान्य व कबुल केले आहे.

तरीही वर उल्लेखित भुखंडांचे मुळ जमिन/भुखंड मालक यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत हस्तांतरण होण्याकरिता मे. सिडकोमार्फत संबंधित हस्तांतरण पुर्वपरवानगी स्विकारुन त्रिपक्षीय करारनामा निष्पादित व नोंदणी करण्याचे ठरविले आहे, परंतु तत्पूर्वी सदर भुखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी व कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही असे असणे आवश्यक आहे, त्याकरिता जर सदर भुखंडांवर कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबंध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **पंधरा (१५) दिवसांच्या आत** सादर करावे आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरचा भुखंड हा सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता आमचे अशिल हे सदरहु भुखंडासंदर्भातील हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करुन घेतील याची नोंद घ्यावी.

कळावे,

दिनांक : ७/११/२०२५

**सही/-**
**ॲड. धनंदा प्रदिप मोकल**

पत्ता: शॉप नं. १४, शिव चेंबर्रस, प्लॉट नं. २१, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे

## पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५

### आरक्षण सोडत कार्यक्रम

### जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिकेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनूसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण महिलासांठी आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढणे, तसेच आरक्षणांचे प्रारूप प्रसिद्ध करून हरकती व सूचना मागविण्यासाठी खालील प्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | आरक्षण सोडत दिनांक | मंगळवार, दिनांक- ११ नोव्हेंबर, २०२५ सकाळी ११.०० वा.<br>स्थळ - आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृह, पनवेल महानगरपालिका |
| २ | आरक्षणाचे प्रारूप प्रसिद्ध करण्याचा दिनांक | सोमवार<br>दिनांक - १७ नोव्हेंबर २०२५ |
| ३ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी | सोमवार, दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ ते सोमवार, २४ नोव्हेंबर, २०२५ (दुपारी ३.०० वाजेपर्यंत) |
| ४ | हरकती व सूचना दाखल करण्याचे ठिकाण | पनवेल महानगरपालिका मुख्यालय (नागरी सुविधा केंद्र) अथवा संबंधित प्रभाग कार्यालय येथे सादर कराव्यात. |

**टिप:- दाखल झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन आरक्षणाची अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येईल.**

ठिकाण :- पनवेल
दिनांक :- ०८/११/२०२५

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.५७६/५९७/२०२५

**सही**
**आयुक्त,**
पनवेल महानगरपालिका

## PANVEL MUNCIPAL CORPORATION
## GENERAL ELECTION 2025
### PROGRAMME FOR THE DRAW OF LOTS FOR RESERVATION
### PUBLIC NOTICE

For the General Election of Panvel Municipal Corporation to be held in the year 2025 The Programme for the Draw of lots for reservation of seats in the category of the Scheduled Caste (women), Scheduled Tribes (women), Backward Class of Citizens, backward Class of Citizens (women) & Women from General Category and for the publication of reservation is as below.

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of the Draw for the reservation | Tuesday, Date - 11 November, 2025 At 11.00 a.m<br>Place : Adya Krantiveer Vasudev Balwant Phadke Auditorium |
| 2 | Date of publishing the draft of reservation | Monday, Date - 17 November, 2025 |
| 3. | Last date of submitting Objections & Suggestions | Monday, Date - 17/11/2025 To Monday, Date - 24/11/2025 |
| 4. | Place where Objections & Suggestions are to be filed. | Panvel Muncipal Head office (Citizen Facility Center ), or concerned ward Office |

**Note :- After considering all Objections & Suggestions, final notification of reservation will be published.**

Place:- Panvel
Date: 08/11/2025

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.५७६/५९७/२०२५

**Sd/-**
**Commissioner,**
Panvel Municipal Corporation

# महापालिकेचा अधिकारी सांगून पैसे उकळणारा पोलिसांच्या ताब्यात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील वाशी भागात घराचे नूतनीकरण बेकायदा असून दीड लाख रुपयांचा दंड ठोठावण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तो स्वतः मनपा अधिकारी असल्याची भासवून दंड ठोठावण्याची धमकी देत सेटलमेंटच्या नावाखाली लाखो रुपये उकळत असल्याचे समोर आले आहे. त्याच्या विरोधात यापूर्वीही दोन गुन्हे दाखल आहेत.



संदीप तावडे उर्फ अमोल पिसके असे त्या तोतया अधिकाऱ्याचे नाव आहे. नवी मुंबईत मनपा अधिकारी असल्याची थाप मारून दंडात्मक कारवाईची धमकी देत तो खंडणी उकळत होता. गेल्या अनेक महिन्यापासून त्याच्याविरोधात मनपाकडे तक्रारी येत होत्या, मात्र पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यास कोणी धसवत नव्हते, मात्र डॉ.अमृत हंचारे यांनी वाशी विभाग अधिकारी सुखदेव येडवे यांच्या मार्गदर्शखाली अमोल याच्याविरोधात गुन्हा दाखल केला.

नवी मुंबईतील सानपाडा येथे राहणारे डॉ. अमृत यांनी वाशी येथे काही दिवसापूर्वी सदनिका घेतली होती. त्या ठिकाणी ते राहण्यासाठी येणार असल्याने त्या सदनिकेचे नूतनीकरण काम हाती घेतले होते.

यासाठी त्यांनी गृहनिर्माण संस्थेची रीतसर परवानगी घेतली होती. काही दिवसापूर्वी स्वतः मनपा अधिकारी असल्याचे सांगत अमोल पिसके त्यांच्या कडे आला. त्याने हे नूतनीकरण बेकायदा अधिक अनधिकृत काम केल्या प्रकरणी दीड लाख रुपये दंड ठोठावला जाईल अशी धमकी दिली.

डॉ.अमोल हंचारे आणि वाशी विभाग अधिकारी सुखदेव येडवे यांची ओळख असल्याने घडला प्रकार त्यांनी येडवे यांच्या कानावर टाकले. त्यावेळी येडवे यांनी ती व्यक्ती मनपा अधिकारी नसून तोतया आहे. त्यांना एकही रुपया देऊ नये. त्याच्याविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याचा सल्ला दिला. याबाबत येडवे आणि डॉ अमोल हंचारे यांनी वाशी पोलीस ठाणे गाठत त्याच्याविरोधात तक्रार दाखल केली.

दरम्यान, डॉ अमृत यांनी अमोल पिसके याच्याशी संपर्क करत दंड रक्कम बाबत बोलणी केली. त्यावेळी त्याने पंचेवीस हजार द्या मी निपटून घेतो असे सांगितले. हे पंचेवीस हजार घेण्यासाठी गुरुवारी संध्याकाळी त्यांनी वाशीतील एका हॉटेलमध्ये भेटायचे ठरले. या भेटी वेळीच ठरल्या प्रमाणे वाशी पोलिसांनी सापळा लावला. त्या वेळी अमोल हा २५ हजार रुपये स्वीकारताच त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले.

त्याच्या चौकशीतून त्याचे नाव अमोल पिसके असून तो संदीप तावडे या नावाने मनपा अधिकारी म्हणून वावरत होता हे समोर आले. विभाग अधिकारी सुखदेव येडवे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, गेल्या काही महिन्यापासून तक्रारी येत होत्या. अशा लोकांना थारा न देता संबंधित विभाग अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. अशा वृत्तीला आळा घालण्यातही लोकांनी पुढे यावे.

वाशी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चांदेकर यांनी माहिती देताना सांगितले की, संशयित व्यक्तीला ताब्यात घेतले आहे. याने काही दिवसापूर्वी असेच एक लाख रुपयांची खंडणी घेतली असून त्याच्या विरोधात गुन्हे दाखल आहेत. आम्ही कसून चौकशी करत आहोत.

# खांदा कॉलनीतील गॅरेजसमोरील अनधिकृत पार्किंगवर कारवाई करा

## स्त्री शक्ती फाउंडेशनची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

खांदा कॉलनीमध्ये गॅरेज समोरील अनधिकृत पार्किंगवर कारवाई करावी, अशी मागणी स्त्री शक्ती फाउंडेशनच्या अध्यक्षा विजया कदम यांनी नवी मुंबई वाहतूक शाखा, पनवेल महानगरपालिका अतिक्रमण विभाग व कळंबोली वाहतूक शाखा यांना निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, नवीन पनवेल नोडचा पश्चिम भाग असणाऱ्या खांदा कॉलनी वसाहती मध्ये मोठ्या प्रमाणात लोकवस्ती आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४लगत ही वसाहत असून खांदेश्वर रेल्वेस्थानकसुद्धा हाकेच्या अंतरावर आहे. त्याचबरोबर नवीन पनवेलकडे जाणारा रस्तासुद्धा याच कॉलनी मधून जातो. या व्यतिरिक्त या ठिकाणी महात्मा स्कूल, आगरी शिक्षण संस्था, पिल्लेज ग्लोबल अकॅडमी, न्यू होरायझन, रेयॉन इंटरनॅशनल हायस्कूल, सीकेटी महाविद्यालय आहे. खांदा कॉलनीला एज्युकेशन हबचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्याचबरोबर लोकसंख्येची घनता जास्त असल्यामुळे साहजिकच येथे वाहतूक कोंडीची समस्या उद्भवलेली आहे. त्यातच सेक्टर १ नेत्रज्योत हॉस्पिटल ते शनी मंदिर, रोटरी ब्लड बँक या त्रिकोणामध्ये मोठ्या प्रमाणात गॅरेजेस आहेत. त्यांच्यासमोर बेकायदेशीर रित्या वाहने पार्क केली जातात. बंद पडलेले व्हेईकल्स सुद्धा वर्षानुवर्ष या ठिकाणी ठेवले जातात. दोन्ही बाजूने पार्किंग केली जात असल्यामुळे या रस्त्यावरून जाणे आणि येणे सुद्धा मुश्किल झाले आहे. जवळच हॉस्पिटल्स आहेत येथे रुग्णवाहिका येतानासुद्धा वाट काढावी लागते. त्याचबरोबर आजूबाजूच्या इमारतीत राहणाऱ्या सदनिका धारकांना सुद्धा त्रास होत आहे. हा प्रश्न अत्यंत ज्वलंत असून त्यामुळे हजारो रहिवासी त्रस्त आहेत.

रस्त्यावर अशा प्रकारची बेकायदेशीर पार्किंग करणे कायद्याने गुन्हा आहे. तरी वाहतूक विभागाने रस्ता अडवणाऱ्या या वाहनांवर कारवाई करावी आणि एक मोठी मोहीम राबवून रस्ते मोकळे करावे अशी विनंती त्यांनी पत्राद्वारे केली आहे. तसेच याबाबत योग्य ती कार्यवाही करावी अन्यथा स्त्री शक्ती फाउंडेशनला आंदोलनाशिवाय पर्याय नाही, असा इशाराही दिला आहे.

# महिलेची चेन खेचून चोरटे पसार

**पनवेल : वार्ताहर**

रात्रीच्या जेवणानंतर शतपावलीसाठी घराबाहेर पडलेल्या महिलेच्या अंगावरील सोन्याची चेन खेचून दुचाकीवरून आलेले चोरटे पसार झाल्याची घटना कामोठे सेक्टर-३६ परिसरात घडली. कामोठे पोलिसांनी या घटनेतील दोघा लुटारूंविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.




सुजाता वाघमारे (वय ४०) या खारघर, सेक्टर-३६मध्ये तर त्यांची बहीणही त्याच परिसरात राहतात. सुजाता वाघमारे या कामानिमित्त त्यांच्या बहिणीकडे गेल्या होत्या. जेवल्यानंतर सुजाता वाघमारे या शतपावली करण्यासाठी गेल्या होत्या. त्या सेक्टर-३६ मधील ज्युडिओशेजारील अक्षरकॉन बिल्डिंगजवळ आल्या असताना दुचाकीवरून आलेल्या दोघा लुटारूंपैकी पाठीमागे बसलेल्या लुटारूने सुजाता वाघमारे यांच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचली, दरम्यान सुजाता वाघमारे यांनी आरडाओरड केली, मात्र तोपर्यंत हे दोघे लुटारू भरधाव वेगात तेथून पसार झाले.

या घटनेनंतर सुजाता वाघमारे यांनी कामोठे पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. या घटनेतील लुटारू सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असले, तरी त्यांनी आपली ओळख पटू नये यासाठी तोंडाला रुमाल बांधल्याचे आढळले. असे असले तरी या लुटारूंचा इतर मार्गाने शोध घेत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# नवी मुंबईत डस्ट सप्रेशन व्हेईकलद्वारे कार्यवाही

## हवेतील धूलीकण कमी करण्यासाठी मनपाचा उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

पावसाच्या उघडीपीनंतर रस्त्याच्या कडेला काही प्रमाणात साचलेली माती सुकून हवेतील धुळीचे प्रमाण जरा वाढलेले दिसते. यावर ठोस उपाययोजना करण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ब्रश तसेच फ्लीपर मशीन यांच्या सहाय्याने रस्त्यांच्या तसेच पदपथाच्या कडेला साचलेली माती साफ करून त्या ठिकाणाहून उचलून नेण्यात येत आहे.



याकरिता महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार सर्व विभागांत सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यात येत आहेत. त्यासोबतच राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमांतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेकडे असलेल्या पाच अत्याधुनिक डस्ट सप्रेशन व्हेईकलद्वारे हवेतील धुळीचे प्रमाण कमी करण्याची प्रभावी कार्यवाही करण्यात येत आहे. महानगरपालिका क्षेत्रातील ठाणे बेलापूर रोड, आम्र मार्ग, एआयडीसी क्षेत्रातील मुख्य रस्ते, पामबीच मार्ग अशा वर्दळीच्या रस्त्यांवर या वाहनाव्दारे हवेत पाण्याचे हलके फवारे मारून हवेतील धूलीकण कमी करण्यात येत आहेत. त्यासोबतच रस्ते व पदपथांच्या कडेलाही पाणी मारुन स्वच्छता करण्यात येत आहे. याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेच्या आधुनिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील शुध्द केलेले प्रक्रियाकृत पाणी वापरले जात आहे.

या आधुनिक वाहनाव्दारे हवेत पाण्याचे हलके फवारे सोडण्यात येतात, त्यामुळे हवेतील धूळ खाली जमिनीवर बसते व त्याठिकाणी वाहनातील ब्रशींग सिस्टिमव्दारे पाणी मारून सफाई करण्यात येते. त्यासोबतच या वाहनाद्वारे रस्त्याच्या कडेला असलेल्या तसेच दुभाजकांमध्ये असलेल्या झाडांवरही हलके फवारणी करून त्याठिकाणची धूळ व कार्बनचे कण धुवून घेण्यात येत आहेत.

ही ५ वाहने सकाळी ७ ते ३, ३ ते ११ व ११ ते ७ अशा तीन शिफ्टमध्ये २४ तास चालविली जात असून त्यांनी आपल्या शिफ्टमध्ये कोणत्या रस्त्यावर कार्यवाही करायची याचे विभागनिहाय वेळापत्रक आखून दिलेले आहे व त्यानुसार स्वच्छता करण्यात येत आहे.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील हवेची शुध्दता चांगली रहावी याकरिता महानगरपालिकेच्या वतीने विविध उपाययोजना केल्या जात असून या ५ डस्ट सप्रेशन व्हेईकलमुळे हवेतील पीएम १० आणि पीएम २.५ हे धुलीकण कमी करण्यास फॉगींगव्दारे मदत होते तसेच रस्ते, पदपथ, दुभाजक यांचीही सफाई केली जाते. या माध्यमातून नवी मुंबईचे पर्यावरण चांगले राखण्यासाठी महापालिका कटिबध्द राहून काम करीत आहे.

# नवी मुंबई महापालिका मुख्यालयात वंदे मातरम्‌चे समूह गायन

**नवी मुंबई : बातमीदार**

'वंदे मातरम' या गीतास शुक्रवारी (दि.७) १५० वर्षे पूर्ण होत असल्याने संपूर्ण देशभरात 'वंदे मातरम्' गीताचे सामुहिक गायन करण्याचे केंद्र सरकारच्या संस्कृती मंत्रालयामार्फत तसेच महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत सूचित करण्यात आलेले आहे.

त्यास अनुसरुन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे सकाळी १० वाजता 'वंदे मातरम्' गीताचे सामुहिक गायन मोठया उत्साहात झाले. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत सर्व शाळा व महाविद्यालयांमध्येही 'वंदे मातरम्' गीताचे सामुहिक गायन करण्याच्या निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांप्रमाणे समुहगान करण्यात आले. नवी दिल्ली येथे पंतप्रधान महोदय यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या 'वंदे मातरम्' या विशेष कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपणही महापालिका मुख्यालयात ॲम्फिथिएटर मधील मोठ्या एलईडी स्क्रिनवर प्रक्षेपित करण्यात आले.



बंकिमचंद्र चटोपाध्याय यांच्या 'आनंदमठ' कादंबरीत असलेले 'वंदे मातरम्' हे गीत ७ नोव्हेंबर १८७५ रोजी अक्षय नवमीच्या दिवशी लिहिले गेले असे मानले जात असून स्वातंत्र्य चळवळीपासून आजतागायत ते प्रत्येक भारतीयाचा उद्घोष झाले आहे. १८९६ मध्ये गुरुदेव रविंद्रनाथ टागोर यांनी प्रथमत: 'वंदे मातरम्' गायले व पुढे ते स्वातंत्र्यसैनिकांचे प्रेरणागीत बनले. आझाद हिंद सेनेच्या घोषणेप्रसंगी 'वंदे मातरम्' गायले गेले.

१९०५ मध्ये बंगालच्या फाळणीविरुध्द निषेधाचा 'वंदे मातरम्' हा मंत्र होता. १९०७ मध्ये मॅडम भिकाजी कामा यांनी भारताबाहेर प्रथमच बर्लिन येथे तिरंगा ध्वज फडकावला त्यावर 'वंदे मातरम्' हे शब्द लिहले होते. २४ जानेवारी १९५० रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी संविधान सभेत वंदे मातरमला राष्ट्रगीताप्रमाणेच दर्जा आहे हे प्रस्थापित केले. अशाप्रकारे 'वंदे मातरम्' हा प्रत्येक भारतीयाचा अंत:स्वर झाला.

या अनुषंगाने केंद्र व राज्य सरकारच्या निर्देशानुसार ७ नोव्हेंबर २०२५ रोजी 'वंदे मातरम्' गीताचा १५० वा वर्धापनदिन साजरा होत असताना महापालिका मुख्यालयात ॲम्फिथिएटर येथे 'वंदे मातरम्' गीताचे समुहगान आयोजित करण्यात आले होते. या वेळी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्यासह विविध विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारीवृंद तसेच डीपीएस स्कुल, नेरूळ व एसएस स्कुल, नेरुळ या शाळांचे स्काऊट गाईड विद्यार्थी व शिक्षक मोठया संख्येने उपस्थित होते.

भारतीय जनमानसात देशाविषयीचे प्रेम व देशभावना जागृत होण्यासाठी महत्वाची भूमिका बजावणाऱ्या 'वंदे मातरम्' या गीताच्या समुह गायनातून राष्ट्रप्रेमाने भारलेले वातावरण निर्माण झाले होते.

# 'केबीपी'मध्ये वंदे मातरम् सार्ध शताब्दी महोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजमध्ये महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाच्या आदेशानुसार वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताला १५० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल शुक्रवारी (दि.७) वंदे मातरम् सार्ध शताब्दी महोत्सवाचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.



या कार्यक्रमात डॉ. आबासाहेब सरवदे यांनी वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताचे भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातील महत्त्व व योगदान याविषयी माहिती दिली. या गीतामुळे स्वातंत्र्यवीरांना लढण्याची प्रेरणा आणि ऊर्जा मिळाली. हे गीत देशभक्ती, स्वाभिमान व बलिदानाची भावना जागृत करते. वंदे मातरम् या गीताचे गीतकार बंकीमचंद्र चट्टोपाध्याय यांनी आनंदमठ या कादंबरीमध्ये हे गीत लिहिले.

या वेळी बंकीमचंद्र चटोपाध्याय यांच्या जीवनचरित्रावर व साहित्यिक योगदानावरही भाष्य करण्यात आले.

या कार्यक्रमात विद्यार्थी व शिक्षक यांनी वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताचे सामुहिकरित्या गायन केले. कार्यक्रम महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. राजेश्री घोरपडे यांच्या उपस्थितीत झाला. या कार्यक्रमाला एनसीसी, एनएसएस मधील विद्यार्थी, सर्व विभागाचे विभागप्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते.

क्लिक...क्लिक...!



**मुरुड : यंदा पावसाळा खूपच लांबल्याने पर्यटकांना जंजिरा किल्ला पाहता आला नव्हता. सध्या पाऊस सरून ऊन पडू लागले आहे. ढगाळ वातावरण नाहीसे झाले असून परिस्थिती पूर्वपदावर येताना दिसत आहे. आता हा किल्ला पर्यटक यांना पाहता येणार आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

# कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी श्रमिक संघटनेची स्थापना

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कामगारांच्या न्याय्यहक्कांसाठी आणि सामाजिक न्यायासाठी लढा देण्यासाठी तीर्था श्रमिक माथाडी व जनरल कामगार संघटना स्थापन करण्यात आली आहे.

या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अरुण गोविंद जाधव असून त्यांचा उद्देश माथाडी कामगार, जनरल कामगार आणि सर्वसामान्य श्रमिकांना न्याय मिळवून देणे हा आहे. दरम्यान, जाधव हे यापूर्वीच पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट मार्फत पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहेत.

पर्यावरण संवर्धनाबरोबरच कामगारांवरील होणारा अन्याय, असुरक्षित कामाचे वातावरण आणि सामाजिक दुर्लक्ष या समस्यांवर त्यांनी स्वतःच्या पुढाकाराने आवाज उठवला आहे.

कामगारांचे प्रलंबित हक्क, वेतन सुरक्षा, विमा, आणि कामाच्या अटी याबाबत सक्रीय भूमिका घेऊन संघटना सर्व कामगारांचे प्रतिनिधित्व करणार आहे. संघटनेचा रजिस्टर क्रमांक डी एन ई/१०९५ महाराष्ट्र असा आहे.

कामगारांना सन्मानाने जगता यावे आणि त्यांचा न्याय्य हक्क मिळावा, हेच आमचे ध्येय आहे, असे संस्थापक अध्यक्ष अरुण गोविंद जाधव यांनी सांगितले. ही संघटना लवकरच राज्यातील विविध औद्योगिक क्षेत्रांमध्ये शाखा स्थापन करून कामगारांच्या समस्यांसाठी सतत लढा देणार आहे.

# रायगडच्या धरण क्षेत्रात मुबलक पाणीसाठा

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात या वर्षी समाधानकारक पाऊस पडल्याने २८ धरण क्षेत्रात मुबलक पाणीसाठा उपलब्ध आहे. जिल्ह्यातील २८ धरण क्षेत्रात नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात ९६.४२ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. विशेष म्हणजे १२ धरण क्षेत्रात १०० टक्के पाणीसाठा, तर उर्वरित धरण क्षेत्रात ८० टक्केपेक्षा जास्त पाणीसाठा आहे.



जिल्ह्यातील २८ धरणक्षेत्रातील पाणीसाठा पाहता यामध्ये प्रामुख्याने १०० टक्के पाणीसाठा असलेल्या धरणांमध्ये मुरुड तालुक्यातील फणसाड, तळा तालुक्यातील वावा, रोहा तालुक्यातील सुतारवाडी, म्हसळा तालुक्यातील पाभरे, संदेरी, श्रीवर्धन तालुक्यातील कुडकी, महाड तालुक्यातील खिंडवाडी, कोथुर्डे, खैरे, वरंध, कर्जत तालुक्यातील अवसरे, साळोख या धरणांचा समावेश आहे.

पेण तालुक्यातील आंबेघर धरण क्षेत्रात ९४ टक्के पाणीसाठा, अलिबाग तालुक्यातील श्रीगाव धरण क्षेत्रात ९५ टक्के पाणीसाठा, सुधागड तालुक्यातील कोंडगाव धरण क्षेत्रात ९६ टक्के पाणीसाठा, घोटवडे धरण क्षेत्रात ९३ टक्के पाणीसाठा, ढोकशेत धरण क्षेत्रात ९८ टक्के पाणीसाठा, कवेळे धरण क्षेत्रात ९४ टक्के पाणीसाठा, उन्हेरे धरण क्षेत्रात ९१ टक्के पाणीसाठा, श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले धरण क्षेत्रात ९४ टक्के पाणीसाठा, रानीवली धरण क्षेत्रात ८० टक्के पाणीसाठा, खालापूर तालुक्यातील भिलवले धरण क्षेत्रात ९९ टक्के पाणीसाठा, कलोते मोकाशी धरण क्षेत्रात ९८ टक्के पाणीसाठा, डोणवत धरण क्षेत्रात ८८ टक्के पाणीसाठा, पनवेल तालुक्यातील मोरबे धरण क्षेत्रात ९५ टक्के पाणीसाठा, बामणोली धरण क्षेत्रात ९८ टक्के पाणीसाठा, उसरण धरण क्षेत्रात ९९ टक्के पाणीसाठा, उरण तालुक्यातील पुनाडे धरण क्षेत्रात ९० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. याशिवाय उरुळी धरणामध्ये ८० टक्केपेक्षा जास्त पाणीसाठा उपलब्ध आहे.

# पेणमध्ये वूमन हेल्थ समिटला प्रतिसाद

**पेण : प्रतिनिधी**



रेडरॉक्स वेलनेसतर्फे पेण तालुक्यातील महिलांकरिता वूमन हेल्थ समिटचे आयोजन शहरातील महाकाली हॉल कासारआळी येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या वेळी रेड बॉक्स वेलनेसच्या संस्थापिका तरन्नुम काझमी यांनी सकस आहार, मेडिटेशन व फिटनेससंदर्भात मार्गदर्शन केले. बदलत्या जीवनशैलीमुळे आरोग्यावरील विपरीत परिणाम, व्यायाम व समतोल आहाराने निरोगी राहण्याचा गुरुमंत्र या विषयावर महिलांचे मार्गदर्शन केले. हृदयरोग, मुळव्याध, मधुमेह, उच्च रक्तदाब या व्याधी बदलत्या जीवनशैलीचा परिणाम आहेत. आपली जीवनशैली बदलून या व्याधींवर आपल्याला मात करणे सहज शक्य आहे. स्वास्थविषयक जागरूकता, दैनंदिन जीवनातील आरोग्य आणि व्यायाम व समतोल आहारने आपण निरोगी व सुदृढ राहू शकतो, असे प्रतिपादन त्यांनी केले.

पेणच्या कन्या विद्यालयाच्या माजी मुख्याध्यापिका विजया भट या ७८ वर्षांच्या आजींनी व्यायाम करून तरुण पिढीलाही लाजवेल अशी कामगिरी केल्याने त्यांना एजलेस फिटनेस आयकॉन अवॉर्ड देऊन गौरविण्यात आले. याशिवाय रेड रॉक्स फिटनेस क्लबमधील प्रिती आगरकर (वय ५२), अश्विनी वासकर (४३), तेजल हजारे (५०) व वृषाली दाभोळकर (३८) या महिलांनी पहिल्यांदाच जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत भाग घेऊन उल्लेखनीय कामगिरी करून पदके पटकाविले. त्याबद्दल या कर्तृत्ववान महिलांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. शिल्पा ठाकूर यांनी नऊ किलो वजन व नितुनी पाटील यांनी तीन महिन्यात सात किलो वजन कमी केले, तर शबनम शेख व आरती पंडित यांनी संतुलित आहार व व्यायामाने स्वतःचे वजन व मसल पावर वाढवल्याने सन्मानित करण्यात आले. फिटनेसच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना गौरविण्यात आले.

# खोपोली इनरव्हील क्लबच्या कार्याचा आढावा

**खोपोली : प्रतिनिधी**

इनरव्हील क्लब ऑफ खोपोलीची डीसी व्हिजिट रोटरी क्लब खोपोली हॉलमधे नुकतीच झाली. इनरव्हील क्लबच्या जिल्हा अध्यक्ष डॉ. आशा देशपांडे या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या होत्या. त्यांचे स्वागत खोपोली क्लबच्या अध्यक्ष दिना शहा यांनी केले. या वेळी खोपोली इनरव्हील क्लबने चार महिन्यांत ८१ प्रोजेक्ट केल्याची सविस्तर माहिती चलचित्राद्वारे दाखवण्यात आली




इनरव्हिल क्लब खोपोली ३९ वर्ष कार्यरत आहे. ही संस्था इंटरनॅशनल असून सामाजिक क्षेत्रात काम करते. गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत, गरीब गरजू व्यक्तींना मदत, मिळगाव ठाकूरवाडी येथील आदिवासी ६५ महिलांना किराणा सामान, शालूम शाळेत दोन मोठ्या चटया, खाऊ व ४७५० रू चेक देण्यात आला आहे. लोणावळ्यातील अंध संस्थेला ६५०० रुपयांचे विविध साहित्य देण्यात आले. अशाच प्रकारचे विविध प्रोजेक्ट करण्यात आले.

या वेळी क्लबच्या सेक्रेटरी मधुमिता पाटील, खजिनदार दीपिका कोठारी व इतर सदस्य उपस्थित होते. क्लबच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त झाले.

# मुरूड जोसरांजण ते आळंदी पायी दिंडी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड जोसराजंण येथे श्री ज्ञानराज वारकरी मंडळी आयोजित १४व्या श्री कैवल्य दिंडीत वारकरी महिलांनी डोक्यावर तुळशी वृंदावन घेत व पुरुषांनी टाळ, मृदंग व वीणा वाजवत ज्ञानोबा माऊली... तुकाराम या नामाचा जयघोष केला. त्यामुळे जोसराजंणपासून पुढे मुरूड शहर भक्तिरसाने न्हाऊन निघाले. दिंडीची ही पायी वारी भक्ती, एकात्मता आणि संत परंपरेचा अखंड वारसा जपत आळंदीच्या दिशेने पुढे निघाली आहे.



श्री कैवल्य पायी दिंडी मुरूड जुनी पेठ येथे दाखल झाल्यवर श्री काळभैरव विठ्ठल रुक्मिणी मंदिर ट्रस्टच्या वतीने थाटामाटात स्वागत करण्यात आले. या वेळी महिलांनी ज्ञानेश्वर माऊली व पादुका पूजन, रथ पूजन, तुळसी पूजन व पालखीचे पारंपरिक पद्धतीने पूजन करण्यात आले. त्यानंतर सर्व भाविकांनी श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांचे दर्शन घेतले. या वेळी परिसर भक्तिमय झाला होता. वारकऱ्यांसाठी चहा व फराळाचे आयोजन करण्यात आले होते.

श्री ज्ञानराज वारकरी मंडळाकडून श्री काळभैरव विठ्ठल रखुमाई मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. विश्वास चव्हाण व संचालक यांना श्रीफळ व श्री ज्ञानेश्वर माऊली पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी ट्रस्टचे उपाध्यक्ष संदीप राजपूरकर, खजिनदार प्रकाश चव्हाण, दिलीप जामकर, रूपेश जामकर, वृषाली चव्हाण, अविनाश कोतवाल, सुमित दर्गे, दिनेश भोईर, प्राजक्ता चव्हाण, दिपाली जामकर, अनुराधा चव्हाण, छाया अत्रे, सचिन करंदेकर, अच्युत चव्हाण, प्रतीक्षा जामकर आदींसह भक्तगण उपस्थित होते. ही पायी दिंडी सात दिवसांत आळंदी येथे पोहचणार आहे.

# कर्जतमधील वेणगाव येथे रिक्षा आणि दुचाकीची धडक

## तरुणाचा मृत्यू, तिघे जखमी


**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत-जांभिवली रस्त्यावर वेणगावनजीकच्या श्रद्धा पुनर्वसन केंद्रासमोरील वळणावर दुचाकी व ऑटो रिक्षा यांची समोरासमोर धडक झाली. या अपघातात दुचाकीवर मागे बसलेल्या तरुणाचा मृत्यू, तर तिघे जखमी झाले आहेत.

संतोष हिलम यांनी दिलेल्या माहितीनुसार दुचाकीचा टायर अचानक निखळून ती रिक्षावर जाऊन आदळली. त्यामुळे दुचाकीवर मागे बसलेला बाळा अरुण वाघमारे (वय १६, रा. वेणगाव आदिवासीवाडी) याचा जागीच मृत्यू झाला, तर दुचाकीस्वार संतोष मंगल हिलम (वय १९, रा. वाकस), रिक्षाचालक वसंत मधुकर मुंडे (वय ४४, रा. वेणगाव) व रिक्षातील प्रवासी आशा ज्ञानेश्वर केलटकर (वय ५५, रा. वेणगाव) असे तिघे जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# माणगावच्या संगमेश्वर मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त दीपोत्सव

**माणगाव : प्रतिनिधी**



माणगावकरांचे श्रद्धास्थान असलेल्या संगमेश्वर मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त दीपोत्सव कार्यक्रम भाविकांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

संगमेश्वरनगर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संजय साबळे यांच्या हस्ते सायंकाळी महाआरती घेण्यात आली. या वेळी विजय मेथा, सचिन गोरेगावकर, उमेश शेठ, कनोजे अण्णा, अभिजित साबळे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंदिरात व आवारात विद्युत रोषणाई, दिवे व फुलांच्या माळांसह सचिन गोरेगावकर, महेंद्र दळवी, जितू जाधव, हरेश जंगम, पुरोहित, प्रदीप जोशी व संगमेश्वर नगरातील ग्रामस्थांनी आकर्षक अशी सजावट केली होती. उत्सवासाठी ट्रस्टचे सर्व पदाधिकारी तसेच नगरसेवक दिनेश रातवडकर, दीपक म्हशिलकर, समीर रातवडकर, सचिन रातवडकर, नितेश म्हशिलकर, विनय म्हशिलकर, मंथन गायकवाड, विनित नागावकर, रतन धुळे, शैलैंद्र पारखे, प्रयाग मेहता, आर्देश कवटकर व महिला मंडळ यांनी परिश्रम घेऊन त्रिपुरारी पौर्णिमा उत्साहात साजरी केली.



## नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक

# काय करावे व काय करू नये?

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये रायगड जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, मुरुड-जंजिरा, पेण, उरण, कर्जत, माथेरान, रोहा, श्रीवर्धन व महाड या नगर परिषदांच्या सदस्य व अध्यक्षपदांसाठी सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली आहे. याबाबतच्या मार्गदर्शक सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केल्या आहेत.

**काय करावे...**

चालू असलेले कार्यक्रम, योजना पुढे सुरु ठेवता येतील. ज्याविषयी शंका निर्माण होईल अशा बाबींच्या संबंधात राज्य निवडणूक आयोग, महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण, मान्यता प्राप्त करण्यात यावी. पूर, अवर्षण, साथीचे रोग किंवा अन्य नैसर्गिक आपत्ती यामुळे बाधित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी साह्यकारी व पुनर्वसनाच्या उपाययोजना चालू करता येतील व या संदर्भात चालू असलेल्या योजना पुढे सुरू ठेवता येतील. मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रक्कम किंवा वैद्यकीय सवलती देण्याचे समूचित मान्यतेने पुढे चालू ठेवता येईल.

मैदानासारख्या सार्वजनिक जागा सर्व पक्षांना, निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारांना निवडणूक सभा घेण्यासाठी निःपक्षपातीपणे उपलब्ध करून दिल्या पाहिजे. त्याचप्रमाणे सर्व पक्षांना, निवडणुकीस उभे असलेल्या उमेदवारांना हेलिपॅडच्या वापर निःपक्षपातीपणे उपलब्ध करून दिला पाहिजे. विश्रामगृहे, डाकबंगले व इतर शासकीय निवासस्थाने वगैरे बाबतीत निवडणूक आयोगाने व त्या अनुषंगाने शासनाने काढलेल्या आदेशास संपूर्णतः अधीन राहून सर्व राजकीय पक्षांना व निवडणुकीस उभे असलेल्या सर्व उमेदवारांना समानतेच्या तत्त्वावर उपलब्ध करुन देता येणे अनुज्ञेय असल्यास त्याप्रमाणे देण्यात यावेत. इतर राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांच्यावर करण्यात देणारी टीका ही त्यांची धोरणे, कार्यक्रम, पूर्वीची कामगिरी, पार पडलेली कामे, केवळ या बाबींशी संबंधित असावी. शांततामय व उपद्रवरहित गृहस्थ जीवन जगण्याच्या प्रत्येक व्यक्तीच्या अधिकाराचे पूर्णपणे जतन करण्यात यावे. प्रस्तावित सभेची जागा व वेळ याविषयी स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना पूर्ण माहिती देण्यात यावी आणि त्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या मिळविण्यात याव्यात. प्रस्तावित सभेच्या जागी निर्बंधात्मक व प्रतिबंधक आदेश जारी केलेले असल्यास त्यांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. आवश्यक असल्यास त्याबाबत सवलत मिळण्याविषयी अर्ज केले पाहिजेत व वेळीच अशी सवलत मिळविली पाहिजे. प्रस्तावित सभेसाठी ध्वनिक्षेपक किंवा कोणत्याही इतर अशा सवलतीचा वापर करण्यासाठी योग्य परवानगी मिळविली पाहिजे. सभेमध्ये अडथळे आणणाऱ्या किंवा अव्यवस्था निर्माण करणाऱ्या व्यक्तींना प्रतिबंध करण्यासाठी पोलिसांचे सहाय्य मिळविण्यात यावे.

कोणत्याही मिरवणुकीची प्रारंभीची वेळ व जागा, मिरवणूक ज्या मार्गाने जाईल तो मार्ग व मिरवणुकीची अखेर होईल अशी वेळ व स्थान ही बाब आगाऊ स्वरुपात निश्चितपणे ठरविण्यात यावी व पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी. मिरवणूक ज्या वस्तीमधून जात असेल त्या वस्त्यांबाबत कोणतेही निर्बंधात्मक आदेश जारी केलेले असल्यास त्या विषयी खात्री करून त्याचे पूर्णपणे अनुपालन करण्यात यावे. त्याचप्रमाणे सर्व वाहतूक नियमांचे व अन्य निर्बंधांचे अनुपालन करण्यात यावे. मिरवणुकीमुळे वाहतुकीत कोणताही अडथळा निर्माण होऊ देऊ नये. ज्यांचा क्षेपके किंवा हत्यारे म्हणून गैरवापर होऊ शकेल अशा कोणत्याही वस्तू मिरवणुकीत सहभागी असलेल्या व्यक्तींनी बाळगू नयेत.

मतदानाचे काम शांतता व सुव्यवस्थेने पार पडावे यासाठी सर्वतोपरी सर्व निवडणूक अधिकाऱ्यांना सहकार्य देण्यात यावे. उमेदवार व त्याच्या अधिकृत कार्यकर्त्यांनी विहित परवानगी घेऊन योग्य असे बिल्ले व ओळखपत्रे, निवडणूक प्रशासनाकडून मिळवावीत व ती निवडणुकीचे काम करणाऱ्या व्यक्तींनी ती दर्शनी भागावर लावावीत. मतदारांना देण्यात येणाऱ्या ओळखचिठ्ठ्या साध्या (पांढऱ्या कागदावर देण्यात येतील य त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे किंवा पक्षाचे नाव यांचा निर्देश असणार नाही. मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापरावरील निर्बंधांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. राज्य निवडणूक आयोगाचे, महानगरपालिका आयुक्त यांचे अथवा जिल्हाधिकाऱ्यांचे किंवा त्यांनी प्रधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दिलेले वैध प्राधिकारपत्र असल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस कोणत्याहीवेळी मतदान कक्षात प्रवेश करता येणार नाही. वरच्या दर्जाच्या कोणत्याही व्यक्तींना (उदा. मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री, संसद सदस्य, विधानसभा सदस्य, विधान परिषद सदस्य) यांनाही यातून सूट देण्यात आलेली नाही.

निवडणूक संबंधातील कोणतीही तक्रार किंवा समस्या, निवडणूक निर्णय अधिकारी, क्षेत्र, प्रभाग दंडाधिकारी यांच्या किंवा राज्य निवडणूक आयोग यांनी नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. राज्य निवडणूक आयोग, आयुक्त, महापालिका, जिल्हाधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी यांचे निवडणुकीच्या विविध पैलूंच्या संबंधातील सर्व बाबींविषयीचे निर्देश, आदेश, अनुदेश यांचे पालन करण्यात यावे.

**काय करू नये....**

शासकीय वाहने किंवा कर्मचारीवर्ग किंवा यंत्रणा यांचा निवडणूक प्रचारविषयक कामासाठी वापर करण्यात येऊ नये. शासकीय वाहनात पुढील कार्यालयाच्या वाहनाचा समावेश असेल :- केंद्र शासन, राज्य शासन, केंद्र व राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे, केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त क्षेत्रातील उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, महापालिका, नगर परिषदा, नगरपंचायती, पणन मंडळ (कोणत्याही नावाचे), सहकारी संस्था, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती, ज्यामध्ये सार्वजनिक निधी मग तो एकूण निधीच्या हिश्यातील कितीही अल्पांशाने असो गुंतवण्यात आला आहे अशी कोणतीही संस्था व संरक्षण मंत्रालय, गृह मंत्रालय, राज्य शासन, केंद्रीय पोलीस संघटना इत्यादीच्या मालकीची असलेली पुढील वाहने-मालमोटारी, लॉरी, टेम्पो, जीपगाड्या, मोटारगाड्या, ऑटोरिक्षा, बसगाड्या, विमाने, हेलिकॉप्टर, जहाजे, बोटी, हॉवर क्रॉफ्ट व इतर सर्व वाहने. सत्तेमध्ये असलेला पक्ष, शासन यांनी साध्य केलेल्या उद्दिष्टांबाबत सरकारी कोषागाराच्या खर्चाने कोणतीही जाहिरात देऊ नये.

कोणत्याही वित्तीय अनुदानाची घोषण करणे, कोनशिला बसविणे, नवीन रस्ते इ. बांधण्याचे वचन देणे इत्यादी गोष्टी करू नयेत. शासन, सार्वजनिक उपक्रम यांच्या सेवेत कोणत्याही तदर्थ नियुक्त्या करू नयेत. मंत्री (राज्यमंत्री व उपमंत्रीसहित) हे उमेदवार असल्याखेरीज किंवा प्राधिकृत प्रतिनिधी असल्याखेरीज किंवा मतदानासाठी मतदार या नात्याने असेल त्याखेरीज मतदान कक्षामध्ये किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करणार नाहीत. निवडणूक मोहीम, प्रचार यांच्या जोडीने कोणतेही सरकारी काम करण्यात येऊ नये. मतदारास आर्थिक किंवा अन्य प्रकारचे कोणतेही प्रलोभन दाखविण्यात येऊ नये. मतदाराच्या जातीय व धार्मिक भावनांना आवाहन करण्यात येऊ नये. विभिन्न जाती, जमाती यांच्यातील किंवा धार्मिक किंवा भाषिक गटातील मतभेद ज्यामुळे अधिक तीव्र होतील किंवा परस्परातील वैमनस्य वाढेल किंवा त्यांच्यात तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करण्याचा प्रयत्न करण्यात येऊ नये. इतर पक्षांचे कोणतेही नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक कार्याशी संबंधित नसेल अशा त्यांच्या खासगी जीवनातील कोणत्याही पैलूवर टीका करण्याची परवानगी देण्यात येऊ नये. ज्यांचा खरेखोटेपणा पडताळून पाहिलेला नाही असे आरोप ठेवून किंवा त्यास विकृत स्वरूप देऊन इतर पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर टीका करण्यात येऊ नये.

निवडणूक प्रचार तसेच भाषणे, निवडणूक प्रचाराचे फलक, संगीत इत्यादींसाठी प्रार्थनास्थळांचा वापर करण्यात येऊ नये. लाच देणे, अवाजवी प्रभाव टाकणे, मतदारांना धाकदपटशा दाखविणे, खोट्या नावाने मतदान करणे, मतदारांना मतदान कक्षापर्यंत पोहोचविणे व तेथून परत नेणे यासारख्या भ्रष्ट प्रथा किंवा निवडणूकविषयक अपराध करण्यास प्रतिबंध आहेत. व्यक्तींची मते किंवा कृत्ये याविरुद्ध निषेध व्यक्त करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने किंवा धरणे धरण्यात येऊ नये. कोणत्याही व्यक्तीला, अन्य कोणत्याही व्यक्तीची जमीन, इमारत आवारभिंत इत्यादींचा वापर त्यांच्या मालकांच्या परवानगीखेरीज करणे, ध्वजदंड उभारणे, कापडी फलक लावणे, नोटीशी चिकटविणे किंवा घोषणा लिहिणे इत्यादी करता येणार नाही. यामध्ये शासकीय, सार्वजनिक व खासगी जागांचा समावेश असेल. इतर राजकीय पक्षांच्या किंवा उमेदवारांच्या सार्वजनिक सभांमध्ये किंवा मिरवणुकीत कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करण्यात येऊ नये.

एका पक्षाची जेथे सभा चालू असेल अशा जागी दुसऱ्या पक्षाद्वारे मिरवणूक काढण्यात येऊ नये. दुसऱ्या पक्षांनी किंवा उमेदवारांनी लावलेली प्रचारपत्रके, भित्तीपत्रके काढून टाकण्यात येऊ नयेत, मात्र याबाबत काही आक्षेप असल्यास पोलिसांच्या किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निदर्शनास आणावे. मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठ्या वितरीत करण्याच्या जागी किंवा मतदान कक्षाजवळ प्रचारपत्रके, पक्षांचे ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करू नये. ध्वनिक्षेपकांचा मग ते एकाच जागी लावलेले असोत किंवा फिरत्या वाहनांवर बसविलेले असोत. सकाळी ६ वाजण्यापूर्वी किंवा रात्री १० वाजल्यानंतर आणि संबंधित प्राधिकाऱ्यांची लेखी पूर्वपरवानगी घेतलेली असल्याखेरीज वापर करू नये तसेच याबाबत असलेले The Noise Pollution (Regulation and Control) Rules २०००ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी तसेच संबंधित प्राधिकाऱ्यांची लेखी पूर्वपरवानगी असल्याखेरीज सार्वजनिक सभेच्या जागी किंवा मिरवणुकीत किंवा प्रचारफेरीत ध्वनिक्षेपकाचा वापर करू नये. अशा सभा, प्रचारफेरी रात्री १०नंतर चालू ठेवण्याची परवानगी देण्यात येणार नाही. याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन व्हावे तसेच घालून दिलेल्या अटींचे पालन करावे. याखेरीज स्थानिक कायदे, त्या क्षेत्रातील सुरक्षिततेच्या आवश्यकतेचा स्थानिक दृष्टिकोन आणि हवामान, सणासुदीचे दिवस, परीक्षेचा काळ यांच्या अधीनतेने असतील. निवडणुकीच्या काळात कोणत्याही प्रकारच्या पैशाचे, मद्याचे, वस्तूंचे वाटप करण्यात येऊ नये.

**-मनोज सानप**, रायगड जिल्हा माहिती अधिकारी

# भारताचा पाकिस्तानवर पुन्हा विजय

## हाँगकाँगमधील स्पर्धेत रॉबिन उथप्पाची चमकदार खेळी

**हाँगकाँग : वृत्तसंस्था**

हाँगकाँग सिक्सेस २०२५च्या ‘क’ गटातील एका महत्त्वपूर्ण लढतीत भारत आणि पाकिस्तान आमनेसामने आले. हा सामना पूर्ण षटकांचा खेळला जाऊ शकला नाही आणि अखेरीस डकवर्थ-लुईस नियमाच्या आधारावर भारताला विजयी घोषित करण्यात आले. या अटीतटीच्या सामन्यात भारताने पाकिस्तानला दोन धावांनी पराभूत केले. भारताचा सलामीचा फलंदाज रॉबिन उथप्पा याला त्याच्या आक्रमक खेळीसाठी ‘प्लेअर ऑफ द मॅच’ पुरस्काराने गौरवण्यात आले.



या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित सहा षटकांमध्ये चार गडी गमावून ८६ धावा फटकावल्या आणि पाकिस्तानसमोर विजयासाठी ८७ धावांचे लक्ष्य ठेवले. प्रत्युत्तरात पाकिस्तानच्या संघाने दुसऱ्या डावात तीन षटकांमध्ये एक गडी गमावून ४१ धावा केल्या होत्या, पण त्याचवेळी मुसळधार पावसाला सुरुवात झाली आणि त्यानंतर पुढील खेळ होऊ शकला नाही. अखेरीस डकवर्थ-लुईस नियमानुसार भारताला विजयी घोषित करण्यात आले.

पाकिस्तानविरुद्धच्या या डावाची सुरुवात करण्यासाठी रॉबिन उथप्पा आणि भरत चिपली मैदानात उतरले. या दोन्ही सलामीच्या फलंदाजांमध्ये पहिल्या गड्यासाठी ४२ धावांची भागीदारी झाली आणि त्यानंतर उथप्पा बाद झाला. उथप्पाने अवघ्या ११ चेंडूंमध्ये तीन षटकार आणि दोन चौकारांच्या मदतीने २८ धावांची जलद खेळी साकारली. या दरम्यान त्याचा स्ट्राइक रेट २५४.५५ होता. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेला स्टुअर्ट बिन्नी फारशी चमक दाखवू शकला नाही आणि तो दोन चेंडूंमध्ये एका चौकाराच्या सहाय्याने चार धावा करून तंबूत परतला.

चौथ्या क्रमांकावर कर्णधार दिनेश कार्तिक स्वतः फलंदाजीसाठी उतरला. त्याने सहा चेंडूंमध्ये एक षटकार आणि दोन चौकारांच्या मदतीने नाबाद १७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. भरत चिपलीने १३ चेंडूंमध्ये दोन षटकार आणि दोनचौकारांसह २४ धावांचे योगदान दिले, तर अभिमन्यू मिथुनने पाच चेंडूंमध्ये एका चौकाराच्या मदतीने सहा धावा केल्या आणि तो धावबाद झाला. पाकिस्तानकडून गोलंदाजी करताना मोहम्मद शहजादने सर्वाधिक दोन बळी घेतले, तर अब्दुल समदला एक यश मिळाले.

पावसामुळे थांबलेल्या दुसऱ्या डावात पाकिस्तानने तीन षटकांमध्ये एक गडी गमावून ४१ धावा केल्या होत्या.

# खोपोलीत राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा

## कुस्ती प्रशिक्षण केंद्राचा सर्वांना फायदा होईल -परेश ठाकूर



**खोपोली : प्रतिनिधी**

कुस्ती खेळात आता चांगल्यापैकी पाठबळ मिळत आहे. तरुणांचा कल जास्तीत जास्त दिसून येत असून आयोजकांची संख्या वाढणे गरजेचे आहे. रायगड जिल्ह्यात पनवेलमधील कामोठे येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून कुस्ती प्रशिक्षण केंद्र उभे राहत आहे. त्याचा निश्चित रायगड जिल्ह्याला फायदा होणार आहे. आम्ही त्याबाबत पाठपुरावा करीत असल्याचे रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष परेश ठाकूर यांनी सांगितले.

खोपोलीतील महाराजा मंगल कार्यालयाच्या काशी स्पोर्ट्‌च्या मॅटवर शालेय राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन विक्रम साबळे फाउंडेशन, राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी, भाऊसाहेब कुंभार न्यास तसेच टाटा स्टील व इतर कंपन्यांच्या सहकार्याने करण्यात आले होते. या स्पर्धेस कुस्तीगीर संघाचे जिल्हाध्यक्ष परेश ठाकूर यांनी शुक्रवारी (दि.७) भेट देत खेळाडूंना शुभेच्छा दिल्या व आयोजकांचे कौतुक केले.

कार्मेल स्कूलच्या बँड पथकाने मान्यवरांचे स्वागत केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धपुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन केल्यानंतर क्रीडा ध्वजाचे अनावरण करण्यात आले. या वेळी परेश ठाकूर यांच्या हस्ते क्रीडांगणास श्रीफळ वाढवून प्रारंभ करण्यात आला. व्यासपीठावर रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, विक्रम साबळे फाउंडेशनचे अध्यक्ष विक्रम साबळे, व प्रायोजक कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी, शिवछत्रपती विजेते मारुती आडकर, इतर मान्यवर प्रशिक्षक, पंच व क्रीडाप्रेमी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचे व महाराष्ट्र पातळीवरील पंचांचे स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.


प्रास्ताविक रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी केले. भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यासचे अध्यक्ष राजाराम कुंभार यांनी या स्पर्धेच्या आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली. स्पर्धेसाठी आलेल्या सर्व मल्ल व प्रशिक्षकांचे त्यांनी मनापासून आभार मानले. सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक जगदीश मरागजे यांनी केले. विक्रम साबळे फाउंडेशन व हेल्प फाउंडेशनने या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

# माणगावचा सुपुत्र अजिंक्य काप ‘हाफ आयर्नमॅन फिनिशर’

## मलेशियातील स्पर्धेत एन्ड्युरन्स कॉर्नर संघाचा दमदार पराक्रम

**माणगाव : बातमीदार**

माणगाव येथील तरुण खेळाडू अजिंक्य बाळकृष्ण काप याने मलेशियातील लंगकावी येथे झालेल्या आयर्नमॅन ७०.३ या आशियातील सर्वात कठीण ट्रायथलॉन स्पर्धांपैकी एक स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण केली. सद्यस्थितीत पुणे येथे जॉब सांभाळून मिळविलेल्या या त्याच्या यशाचे कौतुक होत आहे.



स्पर्धा एन्ड्युरन्स कॉर्नर या पुण्यातील प्रतिष्ठित एन्ड्युरन्स प्रशिक्षण संस्थेच्या संघामार्फत खेळली गेली. तापमान तब्बल ३८ अंश सेल्सिअस आणि ८८ टक्के आर्द्रता असताना सर्व सदस्यांनी शर्यत यशस्वीरित्या पूर्ण केली.

माणगाव मधिल सुपरिचीत शिक्षिका तथा निवेदिका काप मॅडम आणि कृषी अधिकारी बाळकृष्ण काप यांचा पुत्र असलेल्या अजिंक्य याने पहिल्याच प्रयत्नात हाफ आयर्नमॅन फिनिशर म्हणून सात तास तीन मिनिटे ५४ सेकंदात स्पर्धा पूर्ण केली. यात त्याने स्विमिंग (१.९ किमी) : ४७ मिनिटे १२ सेकंद, सायकलिंग (९० किमी) : तीन तास २२ मिनिटे ३५ सेकंद, रनिंग (२१.१ किमी) : दोन तास ४१ मिनिटे ५४ सेकंदात पूर्ण केली.

संघातील अन्य स्पर्धकांमध्ये बद्रीनाथ शास्त्री, विक्रम घोडके, प्रशांत घालके यांचा समावेश होता. सर्वांनी तीव्र उष्णतेचा मुकाबला करत चिकाटी आणि संघभावनेचे दर्शन घडवले. संघाचे प्रमुख प्रशिक्षक कोच रोहन कुंभार यांनी आपल्या तिसऱ्या फुल आयर्नमॅन स्पर्धेत १४ तास ५० मिनिटे १४ सेकंदात यशस्वी फिनिश करत नेतृत्व सिद्ध केले.

# दिव्यांग क्रिकेट स्पर्धेतून मुंबईचे आव्हान संपुष्टात

## अतुल कोकळेची एकाकी झुंज



**मुंबई : प्रतिनिधी**

अतुल कोकळेच्या झुंजार ९७ धावांच्या खेळीनंतरही यजमान मुंबईचे एलआयसी चषक दिव्यांग क्रिकेट स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. हरयाणाने मुंबईचा ११ धावांनी पराभव करीत सेमी फायनलमध्ये धडक दिली.

मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण स्वीकारले होते. अजय म्हात्रेच्या ३४ धावात चार बळीच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर मुंबईने हरियाणाचा डाव १९.४ षटकात १७१ धावात आटोपला. प्रत्युत्तरादाखल मुंबईची सुरुवात २५ धावात पाच बळी अशी अडखळती झाली. अशा परिस्थितीत अतुल कोकिळेच्या ५८ चेंडूतील सात चौकार आणि आठ षटकारांच्या दणकेबाज ९७ धावांच्या खेळीने मॅचमध्ये रंगत आणली, पण हरयाणाच्या गुरजंतने अतुलची विकेट काढल्यामुळे त्याचे शतक हुकले आणि मुंबईचे स्वप्नही भंगले. मुंबईला निर्धारित २० षटकात ९ बाद १६० धावांपर्यंत मजल मारता आली.

# भारताकडून खेळण्यासाठी फुटबॉलपटूने सोडले ऑस्ट्रेलियाचे नागरिकत्व

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

फुटबॉलच्या मैदानात आपल्या कुटुंबाचे ऋण आणि आजोबांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी एका परदेशी फुटबॉलपटूने मोठे पाऊल उचलले आहे. ऑस्ट्रेलियाच्या राष्ट्रीय संघात प्रतिनिधित्व केलेला आणि मुंबईशी नाळ असलेला व्यावसायिक फुटबॉलपटू रायन विल्यम्स याने ऑस्ट्रेलियन नागरिकत्व सोडले आहे. तो आता भारताच्या वरिष्ठ राष्ट्रीय फुटबॉल संघाकडून खेळण्यास पात्र ठरला आहे.

बंगळुरू एफसीचा कर्णधार असलेल्या ३२ वर्षीय विल्यम्सचे लवकरच भारताकडून पदार्पण होण्याची शक्यता आहे. आगामी एएफसी आशियाई चषक २०२७च्या पात्रता फेरीत बांगलादेशविरुद्ध तो भारताच्या जर्सीत दिसू शकतो.

रायन विल्यम्सचे भारतीय कनेक्शन त्याच्या आईमुळे आहे, जिचा जन्म मुंबईतील एका अँग्लो-इंडियन कुटुंबात झाला होता. त्याचे आजोबा लिंकन एरिक ग्रोस्टेट हे मुंबईतील नावाजलेले फुटबॉलपटू होते. त्यांनी तत्कालीन टाटा संघात खेळताना १९५६च्या संतोष ट्रॉफी राष्ट्रीय स्पर्धेत बॉम्बेचे प्रतिनिधित्व केले होते. विल्यम्सने सांगितले की, त्याचे आजोबा नेहमी त्याला भारतात खेळायला येण्यास सांगायचे. ही प्रक्रिया अत्यंत कठीण होती, पण निर्णय सोपा होता. आजोबांनी सांगितले होते भारतात खेळ. माझ्या कुटुंबाने यावर खूप विचार केला. राष्ट्रीय संघात पदार्पण करणे हा कोणत्याही खेळाडूसाठी अभिमानाचा क्षण असतो.

विल्यम्स यापूर्वी २०१९मध्ये ऑस्ट्रेलियन संघाकडून खेळला आहे. तो २०२०पासून भारतात खेळत आहे. त्याने बंगळुरू एफसीमध्ये प्रवेश केला. आपल्या कुटुंबालाही त्याने येथे आणले आहे. तो भारतीय नागरिकत्व स्वीकारून वरिष्ठ भारतीय संघात खेळण्याचा निर्णय घेणारा जपानमध्ये जन्मलेल्या इझुमी अराता (२०१२) नंतरचा दुसरा व्यावसायिक फुटबॉलपटू ठरला आहे.

# धोनी आयपीएल २०२६ सिझनमध्येही मैदानात!

## सीएसकेच्या सीईओंची माहिती

**चेन्नई : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्सच्या चाहत्यांसाठी आनंदाची बातमी आहे. टीमचा माजी कर्णधार आणि भारताचा सर्वात यशस्वी कॅप्टन महेंद्रसिंह धोनी आगामी आयपीएल २०२६ सिझनमध्येही मैदानात दिसणार आहे. सीएसकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) के.सी. विश्वनाथन यांनी स्वतः याबाबत माहिती दिली.

एका खास कार्यक्रमात बोलताना के.सी. विश्वनाथन म्हणाले, नाही, धोनी आयपीएलमधून निवृत्त होत नाही. तो पुढच्या सिझनमध्येही खेळणार आहे. त्यांच्या या वक्तव्यानंतर गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या निवृत्तीच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. विशेष म्हणजे गेल्या सिझनमध्ये चेन्नईची अपेक्षेप्रमाणे कामगिरी झाली नव्हती, तरीही चाहत्यांचा विश्वास धोनीवर कायम होता.

धोनीने २०२०मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती, मात्र तो आयपीएलामध्ये खेळत आहे. २०२४च्या सिझनमध्ये त्याने कर्णधारपद ऋतुराज गायकवाडकडे सुपूर्द केले असले तरी त्याच्या उपस्थितीमुळे संघाला स्थैर्य मिळाले.

सीएसकेने आयपीएलच्या इतिहासात पाच वेळा विजेतेपद पटकावले आहे आणि त्या सर्व हंगामांचे नेतृत्व धोनीने केले आहे. त्याच्या नेतृत्वात संघ जवळजवळ प्रत्येक सिझनमध्ये प्लेऑफपर्यंत पोहचला.

# ऑस्ट्रेलियामध्ये अक्षर पटेलची खास कामगिरी!

**सिडनी : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील चौथ्या सामन्यात टीम इंडियाने यजमानांचा ४८ धावांनी पराभव करत मालिकेत २-१ अशी निर्णायक आघाडी घेतली आहे. या विजयामुळे टीम इंडियाला मालिका गमावण्याचा चिंता नाही, आता शेवटच्या सामन्यावर सर्वांचे लक्ष लागले आहे.

या विजयात टीम इंडियाचा अष्टपैलू खेळाडू अक्षर पटेल याने फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्हीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. अक्षरने केवळ २१ धावांची नाबाद खेळीच केली नाही, तर गोलंदाजी करताना दोन महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या, ज्यामुळे त्याला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-

### टी-२० सामनावीरांमध्ये विराट, गेलसह संयुक्तपणे पहिल्या स्थानावर



२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये अक्षर पटेलचा हा तिसरा सामनावीर पुरस्कार आहे.

या विशेष कामगिरीसह अक्षर पटेलने आता ऑस्ट्रेलियाविरुद्ध टी-२० मध्ये सर्वाधिक सामनावीर पुरस्कार जिंकण्याच्या बाबतीत भारताचा सुपरस्टार विराट कोहली आणि वेस्ट इंडिजचा स्फोटक फलंदाज ख्रिस गेल यांच्याशी बरोबरी साधली. अक्षर आता ऑस्ट्रेलियाविरुद्ध टी-२०मध्ये सर्वाधिक सामनावीर पुरस्कार जिंकणाऱ्या या दिग्गजांसोबत संयुक्तपणे पहिल्या स्थानावर आहे.

या मालिकेतील पहिला सामना पावसामुळे रद्द झाला. दुसऱ्या सामन्यात भारताला चार विकेट्सने पराभव स्वीकारावा लागला. त्यानंतर भारताने पुनरागमन करत तिसरा आणि चौथा सामना जिंकून मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली. आता भारत या टी-२० मालिकेचा पाचवा आणि निर्णायक सामना ८ नोव्हेंबर रोजी ब्रिस्बेनमधील गाबा स्टेडियमवर खेळणार आहे. या सामन्यात विजय मिळवून मालिका खिशात घालण्याचा भारतीय संघाचा प्रयत्न असेल.

# क्रिकेटर प्रतीका रावलला अखेर मिळाले पदक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताची सलामीची बॅटर प्रतीका रावलला हिला अखेर २०२५ महिला क्रिकेट विश्वचषक विजेतेपदाच्या संघाला दिले जाणारे पदक मिळाले आहे. यंदाच्या हंगामात प्रतीका ही भारतीय संघाचा प्रमुख भाग होती. तिने लक्षवेधी कामगिरीही केली, पण साखळी फेरीतील बांगलादेशविरुद्धच्या अखेरच्या लढतीत ती दुखापतग्रस्त झाली. परिणामी १५ सदस्यीय संघातून ती बाहेर पडली. तिच्या जागी भारतीय संघात शफाली वर्माची वाइल्ड कार्ड एन्ट्री झाली होती.

आयसीसीच्या नियमानुसार संपूर्ण स्पर्धेचा भाग असलेल्या खेळाडूंनाच जेतेपदानंतर पदक दिले जाते. त्यामुळेच नवी मुंबईच्या मैदानात भारतीय संघाने विश्वविजेतेपद पटकावल्यावर ती संघाबोत दिसली, पण तिच्या गळ्यात विश्वविजेतेपदाचा दागिना दिसला नव्हता, पण आता आयसीसीने नियमात बदल करून भारताच्या लेकीला तिच्या हक्काचा दागिना अर्थात अन्य खेळाडूंप्रमाणे तिलाही पदक प्रदान करण्यात आले आहे.

प्रतीका रावलचे वडील आणि बीसीसीआय लेव्हल १ अंपायर असलेल्या प्रदीप रावल यांनी एका मुलाखतीममध्ये आपल्या लेकीला विश्वविजेत्या महिला संघाला दिले जाणारे पदक मिळाल्याची पुष्टी केली. आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांच्या पुढाकार घेतल्याची गोष्ट शेअर करताना ते म्हणाले की, प्रतीकाला पदक मिळेल या संदर्भात जय शाह यांनी मेसेजवरून माहिती कळवली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीआधीच प्रतीकाला पदक मिळाले.




पनवेल : महाराष्ट्र प्रदेश आणि उत्तर रायगड भाजपच्या वतीने वंदे मातरम् समूह गायन विशेष कार्यक्रम नवीन पनवेलमध्ये झाला. त्याची ही चित्रमय झलक.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com